सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ७२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ८ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# अखेर मुहूर्त ठरला! अमरावतीहून पहिले विमानोड्डाण १६ एप्रिलला

## सकाळी ११.३० वाजता मुंबईसाठी विमान उड्डाण होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ अमरावती**

अमरावती ते मुंबई या बहुप्रतीक्षित विमानसेवेच्या शुभारंभाचा मुहूर्त अखेर ठरला असून येत्या १६ एप्रिलला अमरावती विमानतळावरून अलायन्स एअरचे विमान मुंबईच्या दिशेने झेपावणार आहे. याच दिवशी विमानसेवेचा शुभारंभ होणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी प्रामुख्याने उपस्थित राहतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

अलायन्स एअरने आपल्या ७२ आसनी विमानसेवेसाठी १६ एप्रिलनंतरच्या तारखांचे बुकिंग अद्याप सुरू केले नसले, तरी येत्या काही दिवसांत विमानसेवेचे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, अशी माहिती देण्यात आली आहे. या विमानसेवेची गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षा केली जात होती. १६ एप्रिलला सकाळी ११.३० वाजता मुंबईसाठी विमान उड्डाण होणार आहे. अमरावती विमानतळावर गेल्या महिन्यात 'एअर कॅलिबरेशन ऑफ प्रिसिजन अप्रोच पाथ इंडिकेटर' अर्थात 'पीएपीआय' चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली.हवाई वाहतूक तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली बंगळुरूहून अमरावतीच्या बेलोरा विमानतळावर उड्डाण केलेल्या




बीच एअर ३६० ईआर टर्बोप्रॉप विमानावर भारतीय विमानतळ प्राधिकरण, फ्लाइट इन्स्पेक्शन युनिटने कॅलिब्रेशन केले. या विमानाने २६/०८ धावपट्टीवरून अमरावती विमानतळावरून उड्डाण केले आणि त्याचे कॅलिब्रेशन यशस्वीरित्या पूर्ण केले होते.

अमरावती विमानतळावर नवीन धावपट्टी तयार करण्यात आली आहे. तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. १८ बाय ५० मीटरची ही धावपट्टी आहे. त्यामुळे येथून एटीआर हे ७२ आसनी विमान उडणार आहे. प्रादेशिक कनेक्टिव्हिटी योजनेअंतर्गत मुंबई-अमरावती-मुंबई मार्गावर अलायन्स एअर या कंपनीच्या माध्यमातून एटीआर ७२ आसनी विमान सेवा सुरू करण्यात आली आहे. विमानतळ आता प्रवासी वाहतुकीसाठी सज्ज झाले आहे.

अद्याप विस्तृत वेळापत्रक जाहीर झाले नसले, तरी अमरावतीकर विमानसेवा सुरू होण्याची गेल्या अनेक महिन्यांपासून प्रतीक्षा करीत आहेत. अलायन्स एअरच्या संकेतस्थळावर प्रवासाची तारीख दर्शविण्यात आली असली, तरी सर्वसामान्य प्रवाशांसाठी बुकिंग सध्या उपलब्ध नाही. ही विमानसेवा अमरावतीच्या विकासात मोठी भूमिका बजावणार असून अमरावती ते मुंबई हा शुभारंभाचा पहिला विमान प्रवास मी अलायन्स एअरच्या विमानाने करणार आहे, अशी माहिती भाजपचे नेते दिनेश सूर्यवंशी यांनी दिली. ही विमानसेवा सुरू केल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.अमरावती विमानतळ विमानसेवेसाठी सज्ज झाले असून अलायन्स एअरकडून वेळापत्रकाची प्रतीक्षा होती. पहिले विमान उड्डाण येत्या १६ एप्रिलला होणार आहे, अशी माहिती अमरावती विमानतळाचे व्यवस्थापक गौरव उपश्याम यांनी दिली.

# अमेरिकेतील ३ लाख भारतीय विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला

## ट्रम्प सरकारने मांडले नवीन विधेयक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८वाशिंग्टन**

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रं हाती घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेले अनेक निर्णय चर्चेत आणि वादात अडकले आहेत. त्यात बकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या स्थलांतरितांची पाठवणी आणि जगभरातल्या देशांवर सरसकट रेसिप्रोकल टॅरिफ लागू करण्याच्या निर्णयावर आंतरराष्ट्रीय वर्तुळातून तीव्र पडसाद उमटले. आता अमेरिकन स्टेट काँग्रेसमध्ये (लोकप्रतिनिधीगृह) डोनाल्ड ट्रम्प सरकारने प्रस्तावित केलेलं एक नवीन विधेयक तिथे राहणाऱ्या ३ लाखांहून अधिक भारतीय विद्यार्थ्यांच्या मुळावरच उठण्याची शक्यता आहे!

अमेरिकन काँग्रेससमोर सादर झालेल्या या विधेयकामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. अमेरिकेत शिक्षण किंवा त्यानंतर तिथे कामाचा अनुभव घेण्यासाठीच्या व्हिसा नियमांमध्ये या विधेयकामुळे मोठे फेरबदल होणार आहेत. हे विधेयक अमेरिकन काँग्रेसनं पारित केल्यास तिथे राहणाऱ्या अशा भारतीय विद्यार्थ्यांना तातडीने देश सोडून मायदेशी परतावं लागणार आहे.




या विधेयकामुळे अमेरिकेत राहणाऱ्या सर्व विदेशी विद्यार्थ्यांच्या वास्तव्यावर टांगती तलवार आली आहे. यात प्रामुख्याने STEM (Science, Technology, Engineering, Mathematics) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना फटका बसणार असल्याचं सांगितलं जात आहे. या विद्यार्थ्यांसाठी ऑप्शनल प्रॅक्टिलक ट्रेनिंगचा (OPT) पर्याय रद्द करण्याचा प्रस्ताव या विधेयकात मांडण्यात आला आहे. त्यामुळे अमेरिकेत शिक्षण व त्यानंतर करिअर घडवण्याचं स्वप्न उराशी बाळगलेल्या विद्यार्थ्यांना याचा मोठा फटका बसणार आहे.हिंदुस्तान टाईम्सनं ओपन डोअर् २०२४ या अहवालाच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, २०२३-२४ मध्ये अमेरिकेत शिकत असलेल्या विदेशी विद्यार्थ्यांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांचं प्रमाण सर्वाधिक होतं. या काळात अमेरिकेत शिकणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांचं प्रमाण तब्बल ३ लाख ३१ हजार ६०२ इतकं होतं. त्याआधीच्या वर्षापेक्षा हे प्रमाण तब्बल २३ टक्के अधिक होतं. यापैकी ९७ हजार ५५६ विद्यार्थ्यांनी OPT चा पर्याय निवडला होता. त्याआधीच्या वर्षापेक्षा हे प्रमाण ४१ टक्क्यांनी अधिक होतं.

**याआधीही मांडलं होतं हे विधेयक!**

दरम्यान, अमेरिकन काँग्रेससमोर याआधीही हे विधेयक मांडण्यात आलं होतं. पण काँग्रेसनं ते नामंजूर केलं होतं. यंदा ट्रम्प यांच्या बेकायदा स्थलांतरिताविरोधातील मोहिमेच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेला पुन्हा महान करण्याच्या प्रयत्नांच्या दबावापुढे हे विधेयक मंजूर होण्याची शक्यता असल्याचं बोललं जात आहे.

# उद्धव ठाकरेंचा एकनाथ शिंदेंना टोला, एसंशिला लोकच म्हणत आहेत, ए चल शी..

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई**

सहदेव पेटकर यांनी आज उद्धव ठाकरेंच्या उपस्थिती शिवबंधन हाती बांधलं आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षात प्रवेश केला. यावेळी उद्धव ठाकरेंनी त्यांचं मनोगत व्यक्त केलं. त्यांनी सहदेव पेटकर यांचे आभार मानले. तसंच शिवसेना एकच आहे, दुसरा पक्ष म्हणजे एसंशि आहे असा पुनरुच्चार करत



एकनाथ शिंदे यांना टोला लगावला आहे. तसंच आत्ताचं सरकार थापा मारुन आलं आहे लोकांना आता खरी आपल्या शिवसेनेची गरज आहे असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

सहदेव पेटकर आज इतक्या जोरात बोलले आहेत की मला काही बोलायची आवश्यकता वाटत नाही. दत्ता यांचं कौतुक करतो कारण ते वाढदिवस असतानाही इथे आले. दत्तांसारखे अनेक शिवसैनिक आहेत जे शिवसेना वाढवण्यासाठी मेहनत करत आहेत. कोकणात एक पाऊल टाका असं मला सांगण्यात आलं पण मी सांगतो एकच पाऊल टाकणार नाही पुन्हा एकदा कोकण पादाक्रांत करेन. कोण मधे येतो बघू. कुणी कसा विजय मिळवला याच्या सुरस कथा बाहेर येऊ लागल्या आहेत. कोकणात या हे जसं तुम्ही सांगत आहात तसा अख्खा महाराष्ट्र, माझे शिवसैनिक, शेतकरी बांधव सगेळ सांगत आहेत की आम्ही फसवलो गेलो. थापा मारुन हे मोकळे झाले आहेत. आत्ता लोकांना आपली खरी गरज आहे. असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

# अमरावतीच्या जुन्या बायपासवरील अनधिकृत वीटभट्ट्यावर कारवाई

## अमरावती महसूल विभागाची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ अमरावती**

अमरावती शहरातील जुना बायपास रोडवर असलेल्या निंभोरा वस्तीगृहानजिक अनधिकृत व अतिक्रमण असलेल्या चार विटभट्टी व काही अनधिकृत बांधकामावर अमरावती महसूल विभागाने कारवाई केली आहे, जेसीबी लावून या ठिकाणी वीटभट्ट्या उध्वस्त करून या ठिकाणी जागा पूर्णपणे सफाई करण्याचं काम चालू आहे तसेच याच ठिकाणी काही बेकायदेशीररित्या बांधकाम करून ठेवलं होतं,ते देखील काम तोडण्याची कारवाई सुरू



आहे, गेल्या अनेक वर्षापासून या ठिकाणी अतिक्रमण करून वीटभट्ट्या सुरू होत्या, या वीट भट्टी मालकांना वारंवार नोटीस बजावून सुद्धा ते हटवण्यात आलं नव्हतं, तर याच ठिकाणी निंभोरा वस्तीगृह आहे, विद्यार्थी या ठिकाणी राहत असल्याने वीट धूर यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्यास परिणाम होत होता त्यामुळे अखेर महसूल विभागाने सर्व वीटभट्ट्या जेसीबीने हटवून त्या उध्वस्त करण्यात आल्या, यावेळी निवासी जिल्हाधिकारी अनिल भटकर हे उपस्थिती होते तर पोलिसांच्या कडक पोलिस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली, यावेळी मोठ्या प्रमाणावर वीटभट्टी मालक चालक कामगार यांनी कारवाईला विरोध केला होता, मात्र या विरोधाला न जुमानता कारवाई करण्यात आली.

# मनसेच्या आंदोलनाचा विषय थेट संसदेत राजेश वर्मांचा थेट राज ठाकरेंवर वार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली**

मनसेच्या आंदोलनाचा विषय संसदेत गाजला आहे. बिहारमधील खगरिया येथील लोकजनशक्ती पार्टीचे खासदार राजेश वर्मा यांनी आरोप केला की, राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) पक्षाचे कार्यकर्ते महाराष्ट्रात उदरनिर्वाहासाठी गेलेल्या हिंदी भाषिक लोकांना मारहाण करत आहेत. महाराष्ट्रात हिंदी भाषिकांवर होणाऱ्या हल्ल्यांचा मुद्दा संसदेत उपस्थित करण्यात आला. केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पार्टीने महाराष्ट्रातील हिंदी भाषिकांना सुरक्षा प्रदान करण्याची मागणी सरकारकडे केली.

संसदेमध्ये राजेश वर्मा यांनी म्हटलंय की, मी तुमच्या माध्यमातून सगळ्यांचं लक्ष एका विशेष मुद्द्यावर केंद्रित करतो. एखादी व्यक्ती जर आपली आई, वडिल आणि कुटुंबाला सोडून जर दुसऱ्या राज्यात जावून नोकरी करत असेल तर, तो शौक म्हणून नाही तर मजबूरी म्हणून करतो. कोणताही कारखाना, उद्योग व्यवसाय, किंवा व्यापारी घराणे




एखाद्या कर्मचाऱ्याला कामावर ठेवत असतील तर त्याच्यावर उपकार करत नाही. त्याची योग्यता पाहून त्याला कामावर ठेवले जाते.तर योग्यतेच्या आधारावर नोकरी देणाऱ्या महाराष्ट्रामध्ये पूर्वांचली हिंदी भाषिंकाना मनसेच्या गुंडाकडून सातत्याने मारहाण केली जात आहे. मी तुमच्या माध्यमातून हा विषय या भवनात मांडू इच्छितो. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांना विनंती करतो की, पूर्वांचली हिंदी भाषिकांना आपण संरक्षण देण्याचं काम करा. कारण मनसेच्या लोकांचं राजकीय अस्तित्व हरवत चाललं आहे. त्यामुळे ते आपल्याला हरवलेल्या राजकीय अस्मितेला जपण्यासाठी असं वागत असल्याची टीका राजेश वर्मा यांनी केलीय.

दरम्यान न्यायालयाने निवडणूक आयोगाला मनसेची मान्यता रद्द करण्याचे निर्देश द्यावेत. राज ठाकरे यांच्या द्वेषपूर्ण भाषणांची आणि त्यानंतर झालेल्या हिंसाचाराची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी उत्तर भारतीय विकास सेनेचे अध्यक्ष सुनील शुक्ला यांनी केली आहे.

# राज्यात झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळणार

## मंत्रिमंडळ बैठकीतील महत्वाचे ९ निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८मुंबई**

राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक आज पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र अधिनियम- १९७१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळणार आहे.

**मंत्रिमंडळ बैठकीतील महत्वाचे निर्णय**

नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व पुणे या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतील शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणार आहे. यातून विकास कामांना वेग येणार आहे.

राज्याचे वाळू- रेती निर्गती धोरण-२०२५ जाहीर. महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा निर्मुलन व पुनर्वसन) अधिनियम-१९७१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय; झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळणार. वांद्रे रिक्लेमेशन व आदर्श नगर (वरळी) या दोन म्हाडा अभिन्यासातील इमारतींचा उऊ- मार्फत एकत्रित पुनर्विकास करण्याचा निर्णय

सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित करण्यासाठी धोरण विशेष अभय योजना-२०२५. नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्यात येणार. खाजगी अनुदानित आयुर्वेद व खाजगी अनुदानित युनानी संस्थांमधील गट-ब, क व ड संवर्गातील शासन मंजूर पदावरील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना पूर्वलक्षी प्रभावाने एक व दोन लाभांची 'सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना' लागू करण्याचा निर्णय.

## संपादकीय ......

# 'ट्रम्पबॉम्ब'चे आव्हान

डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणूक प्रचारावेळी दिलेला इशारा अखेर प्रत्यक्षात आणला. जगातील ६० देशांवर जशास तसे आयात शुल्क लागू करण्याची घोषणा करत आदेशावर स्वाक्षरी केली. त्यानुसार, भारतीय मालावर २७ टक्के आयात कर लावण्यात येणार असून, त्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेची चाके उलटी फिरवली जाऊ लागली आहेत. यात केवळ भारताचेच नाही, तर संपूर्ण जगाचे प्रचंड आर्थिक नुकसान होणार आहे. 'अमेरिका फर्स्ट' म्हणजे केवळ आणि केवळ माझ्याच देशाचे हित पाहणार, असे ट्रम्प यांचे तत्त्वज्ञान! महसुली तूट कमी करून देशांतर्गत उत्पादनाला चालना देण्यासाठी ही करवाढ केल्याचा ट्रम्प यांचा दावा आहे. प्रत्युत्तर म्हणून चीनने अमेरिकी वस्तूंवर आणखी ३४ टक्के आयात शुल्क लादले. आंतरराष्ट्रीय बाजारात मक्तेदारी असलेल्या काही दुर्मीळ संयुगांच्या चीनमधून केल्या जाणार्या निर्यातीवरही राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी निर्बंध घातले. याचा तडाखा अमेरिकेच्या संरक्षण, संगणक आणि स्मार्ट फोन उद्योगांना बसेल. तसेच दुहेरी वापराच्या म्हणजेच लष्करी आणि घरगुती वस्तूंची आयात करणार्या १६ अमेरिकी कंपन्यांवरही चीनने बंदी घातली. तसेच स्वतंत्रपणे अमेरिकेच्या ६ कंपन्यांवर स्वतःचा माल चीनला पाठवण्यावरच बंदी घातली. २०२४ मध्ये अमेरिकेने चीनला १५४ अब्ज डॉलरचा माल पाठवला, तर चीनमधून ४३६ अब्ज डॉलर इतक्या मालाची आयात केली. याचा अर्थ, तुलनेने चीन हा अमेरिकेवर व्यापारासाठी अधिक अवलंबून आहे. गेल्या वर्षी भारताने सर्वाधिक १२९ अब्ज डॉलरचा व्यापार अमेरिकेसोबतच केला. दोन्ही देशांतील व्यापारी तूट वाढत आहे. अमेरिका भारताला जेवढा माल निर्यात करते, त्यापेक्षा ४५ अब्ज डॉलर इतका अधिकचा माल भारताकडून आयात करते.

अमेरिकी वस्तूंवर भारत मोठ्या प्रमाणात आयात शुल्क लावत असल्याचा अमेरिकेचा आरोप आहे. त्यामुळे अर्थातच सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांक गडगडले. ट्रम्प यांच्या करांच्या हल्लयातून बचावलेल्या औषध कंपन्यांच्या समभागांमधील तेजीने निर्देशांकातील तोटा बहुंशी भरून काढला. शेअर बाजार घसरतो तेव्हा गुंतवणूक सोन्याकडे वळते. त्यामुळे सध्या सोन्याच्या भावाची विक्रमी घोडदौड सुरू असून, सोन्याचा भाव १० ग्रॅमला ९४,३५० रुपयांवर जाऊन पोहोचला. भारतात शेतीमाल उत्पादनांवरील आयात कर सरासरी ११३ टक्के असून, काही उत्पादनांवर ३०० टक्के इतकाही आहे, अशी आकडेवारी जागतिक व्यापारी संघटनेला अमेरिकेने दिली आहे. तसेच २०२०-२१च्या अर्थसंकल्पात सोलर इनव्हर्टर व सोलर लँटर्न्ससह ३१ उत्पादनांवरील शुल्क वाढवण्यात आले. एवढेच नव्हे, तर हेडफोन्स, लाऊड स्पीकर्स, स्मार्ट मीटर्स यांनाही कराचा दणका देण्यात आला. भारतात किरकोळ क्षेत्रात विदेशी भांडवल आणण्यावर नियंत्रणे आहेत. बँकिंग क्षेत्रात सरकारी कंपन्यांचे वर्चस्व आहे. विमा क्षेत्रात सरकारी कंपन्यांना झुकते माप दिले जाते, अशा अनेक तक्रारींचा सूर अमेरिकेने आळवला. दि. २ एप्रिल रोजी अमेरिकेने हा महत्त्वाचा निर्णय घेतला. तो मुक्तिदिन आहे. अमेरिकेत उद्योगांचा पुनर्जन्मदिन म्हणून तो ओळखला जाईल आणि त्यामुळे गतकाळाचे वैभव पुन्हा मिळेल, अशी आशा ट्रम्प यांनी निर्णयाची घोषणा करताना व्यक्त केली; मात्र यामुळे अमेरिकेत प्रचंड महागाई निर्माण होणार आहे. संरक्षक धोरणामुळे देशी उद्योगांना लगेच चालना मिळेल, ही ट्रम्प यांची आशा फोल आहे. त्यामुळे स्पर्धा कमी होऊन उलट अमेरिकन उद्योग दुबळे बनतील. जागतिक स्पर्धा नसल्यामुळे अमेरिकेतील उद्योगधंदे वस्तूंचे भाव वाट्टेल तसे वाढवतील. शिवाय चलनवाढीचा फटका ग्राहकांच्या मागणीस बसून, अमेरिकेत मंदी निर्माण होण्याची भीती आहे.

भारतीय मालावर २७ टक्के शुल्क लावले गेले असले, तरीही निर्यातीत आपल्या प्रमुख स्पर्धेत असलेल्या चीनवर अमेरिकेने ५४ टक्के कर लावला. व्हिएतनाम ४६ टक्के, बांगला देशवर ३७ टक्के आणि थायलंडवर ३६ टक्के आयात कर लादले. याचा अप्रत्यक्ष फायदा भारतीय निर्यातदारांना होऊ शकतो. कारण, त्यांच्यावर आपल्यापेक्षा जादा बोजा टाकण्यात आला. भारताने अलीकडील काळात महागड्या मोटारी आणि उच्च क्षमतेच्या मोटारसायकलींवरील आयात कर घटवले. भारत व अमेरिका यांच्यात नवीन व्यापारी कराराबाबत सध्या बोलणीही सुरू आहेत. भारतातून अमेरिकेला औषधनिर्माण व जीवशास्त्रीय क्षेत्रांतून ८.१ अब्ज डॉलर, दूरसंचार सामग्री ६.५ अब्ज, मौल्यवान खडे ५.३ अब्ज डॉलर, पेट्रोलियम उत्पादने ४.१ अब्ज डॉलर, तयार कपडे २.८ अब्ज डॉलर आणि लोखंड व पोलाद उद्योग २.७ अब्ज डॉलर अशी निर्यात होते. सुट्या हिर्यांवर यापूर्वी अमेरिका शून्य टक्के कर लादत होती.

आता त्यावर २० टक्के कर आकारला जाणार आहे आणि सोन्याच्या दागिन्यांवरही ५ ते ७ टक्के कर आकारणी केली जाणार आहे. त्यामुळे भारताच्या निर्यातीला काही प्रमाणात फटका बसणार, हे स्पष्ट आहे. अमेरिकेच्या संकुचित धोरणांमुळे भारताच्या जीडीपीत अर्ध्या टक्क्याची घट होण्याची शक्यताही वित्त संशोधन संस्थांनी व्यक्त केली आहे; मात्र भविष्यात अमेरिकेत चलनवृद्धी होऊन डॉलरची किंमत घसरू शकेल आणि परिणामी रुपयाच्या तुलनेत डॉलर स्वस्त होण्याचीही शक्यता आहे; पण आपली देशांतर्गत बाजारपेठच एवढी मोठी आहे की, इथला माल इथेच जास्त खपतो; पण विकसित भारतासाठी जागतिक बाजारपेठेत मुसंडी मारणे गरजेचे आहे. ट्रम्प यांच्या धोरणांमुळे नव्हे, तर स्वतंत्र दृष्टीने बघितले, तरीही काही क्षेत्रांतील आयात शुल्कांचा व अन्य संख्यात्मक निर्बंधांचा आपल्याला पुनर्विचार करावाच लागेल. अमेरिकेतील बाजारपेठ गमावून चालणार नाही; मात्र त्याचवेळी जगातील अन्य बाजारपेठांकडे मोर्चा वळवण्याच्या दृष्टीने देशांतर्गत उद्योगांची कार्यक्षमता व स्पर्धात्मकता वाढवण्याची गरज आहे. ट्रम्प यांच्या या नव्या करहल्लयाचे नेमके परिणाम आणि या धोरणानंतरच्या व्यापार स्थिरीकरणास वेळ जावा लागेल. भारताच्या उत्पादन क्षेत्राकडे या बदलांचा सामना करण्याची ताकद आहेच; मात्र तिचाही कस लागला आहे, हे वास्तव!

# भाजप म्हणजे कार्यकर्त्यांचा पक्ष

## स्थापनादिनी मुख्यमंत्री फडणवीसांचे प्रतिपादन



### स्थानिक निवडणुका जिंकण्याचा संकल्प

राज्याची ही गती योग्य प्रकारे साधायची असेल, तर सरकार आणि पक्ष यांच्यामधील समन्वय अत्यंत आवश्यक आहे. त्याचवेळी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्याला असाच प्रचंड विजय मिळवायचा आहे, असा संकल्प करूया, असे आवाहनही फडणवीस यांनी केले.

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८मुंबई–** मुंबईत १९८० साली पक्ष स्थापनेच्या वेळी अटलबिहारी वाजपेयी यांनी मावळत्या सूर्याच्या साक्षीने 'अंधेरा छटेगा, सूरज उगेगा, कमल खिलेगा' असा द्रष्टा विचार मांडला. त्यानंतर सातत्याने मेहनत करून आपण सत्तेपर्यंत पोहोचलो आहोत. त्यामुळे भाजप हा सदैव कार्यकर्त्यांचाच पक्ष राहिला, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी भाजप स्थापना दिनाच्या कार्यक्रमात काढले.

याप्रसंगी पक्षाचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिव प्रकाश, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार, राज्य मंत्रिमंडळातील भाजपचे सर्व मंत्री, पक्षाचे खासदार, आमदार, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी जनसंघ ते भाजप या वाटचालीतील तेजस्वी टप्प्यांचा समर्पक आढावा घेतला. ते म्हणाले, सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन करण्याचे काम भाजप करत आहे. शंभर दिवसांच्या कार्यक्रमातून हे सरकार कसे चालणार हे आपण दाखवून दिले आहे. महाराष्ट्र आता थांबणार नाही आणि महाराष्ट्राची गती आपण थांबू देणार नाही, हेच आपल्या सरकारचे ध्येय आहे.

# महिला लोकशून्य दिनाचे विभाग जिल्हा व तालुका स्तरावर

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.८अमरावती–** महिला व विकास विभागाच्या ४ मार्च २०१३ राज्य शासन निर्णयानुसार पीडित पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडणी व्यासपीठ समस्या तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून न्यायाने यादुष्टीने महिलांच्या समस्या/अडचणी राज्यातून समाजातील समस्याग्रस्त/पिडीत महिलांना आनंददायी मार्गदर्शन उपलब्ध व्हावे, यासाठी एक प्रभावी सुविधा म्हणून महिलांना प्रश्न दिनाचे उत्तर दिले जाईल. प्रत्येक समान विभाजन विभागीय स्तरावर, बळकटी व्यवस्था कार्यालय तर दर प्रत्येक चौथ्या तालुका तालुका स्तरावरसिल कार्यालयात आयोजित करण्यात आले आहे.

तरीही समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालविकास विभागीय उपआयुक्त विलास मरसाळे यांनी केले आहे.

# कांदा काढणी करताना आणि सुकवताना काय काळजी घ्यावी? वाचा सविस्तर




**दि.८विदर्भ प्रजासत्ताक**

कांदा पिकहे नाशिक जिल्ह्यातील प्रमुख पिक असून खरीप, रांगडा आणि रब्बी अशा तिन्ही हंगामामध्ये कांद्याची लागवड कमी अधिक प्रमाणात होत असते.त्यापैकी खरीप आणि रांगडा हंगामातील कांदा वगळता रब्बी (उन्हाळ) कांद्याची साठवणूकशेतकरी बांधवांकडून मोठ्या प्रमाणात केली जाते. वर्षभर ग्राहकाला कांदा सहज उपलब्ध होण्यासाठी काढणी पश्चात व्यवस्थापनावर शेतकरी बांधवांनी भर देऊन साठवण क्षमता वाढवणे आवश्यक आहे.

**कांदा काढणी** –हंगामनिहाय, जातीपरत्वे, कांद्याची काढणीची अवस्था वेगवेगळी असते.

खरीपात कांदा काढणीच्या वेळी पाऊस असल्यास माना पडत नसल्याने पक्वतेची ठळक लक्षणे आढळून येत नाहीत.

साधारणतः ३० ते ४० टक्के माना पडल्यानंतर कांदा काढणीस तयार झाला आहे असे समजावे. हि लक्षणे रब्बी हंगामातील कांदा लागवडीमध्ये आढळून येतात.

कांदा पक्व होऊ लागल्यावर नवीन पाने येण्याची थांबतात, तसेच पातीतील अन्नरस कांद्यामध्ये उतरून कांदा घट्ट होऊ लागतो.

कांद्याच्या मानेचा भाग मऊ होऊन पाने मानेजवळ वाकून जमिनीवर पडतात यालाच माना पडणे असे म्हणतात.

**कांदा काढणीच्या अंदाजित २० दिवस आधी पाणी पुरवठा बंद करावा.**

कांद्याची मान आणि आकारमान बघून काढणीचा अंदाज घ्यावा.

**पाने जास्त वाळू न देता कांदा उपटून काढावा.**

माना जास्त वाळल्यानंतर काढणी केल्यास कांदा उपटतांना तुटतो, त्यामुळे कांदा खणून काढावा लागत असल्याने खर्च वाढतो. शिवाय कांद्याला जखमा होईन असा कांदा साठवणुकीसाठी अयोग्य असतो.

कांदा सुकविणे –

कांदा काढल्यानंतर शेतात ३ ते ४ दिवस अशा पद्धतीने सुकवावा की दुसऱ्या ओळीने पहिल्या ओळीचा फक्त कांदा झाकावा.

या पद्धतीने ३-४ दिवस साठवणूक केलेल्या कांद्याची पूर्ण सुकलेली पात ३ ते ४ सें.मी. लांब नाळ ठेवून कापावी.

पात कापल्यानंतर कांद्याची प्रतवारी करून जोडकांदा, डेंगळे आलेला कांदा आणि चिंगळी कांदा विवडून वेगळा करावा.

चांगला कांदा एकत्र गोळा करून सावलीत ढीग घालून १० ते १५ दिवस राहू द्यावा.

रब्बी हंगामात कांद्याची साठवणूक सावलीत ढीग घालून तात्पुरती करता येते. परंतु कांदा मे-जून महिन्यात उशिरा निघत असल्याने अवकाळी पाऊस आणि कडक उन्हाळा लक्षात घेता होणारे नुकसान टाळण्यासाठी कांदा साठवणुकीसाठी संरक्षणात्मक तात्पुरती व्यवस्था करावी.

**– पवन मधुकर चौधरी,**
विषय विशेषज्ञ– उद्यानविद्या, कृषि विज्ञान केंद्र, मालेगाव, नाशिक

स्त्रोत – भा.कृ.अ.प.– कांदा आणि लसूण संशोधन संचलनालय, राजगुरुनगर, पुण




## गव्हाच्या पोळ्या खाऊन वाढतंय वजन, होत आहेत आजार? एक्सपर्ट सांगतात 'या' चपात्या खा



**दि.८विदर्भ प्रजासत्ताक**

भारतातल्या बहुसंख्य लोकांचा प्रमुख आहार म्हणजे भाजी, वरण, भात आणि पोळ्या. गव्हाच्या पोळ्यांऐवजी बाजरीची, ज्वारीची भाकरी, नाचणीची भाकरी, तांदळाच्या पोळ्या असेही प्रकार काही घरांमध्ये केले जातात. पण बहुतांश लोक मात्र सकाळ-संध्याकाळ गव्हाच्या पोळ्याच खातात. एवढ्या जास्त प्रमाणात गव्हाच्या पोळ्या किंवा चपात्या खाणं आरोग्यासाठी आजिबातच चांगलं नाही त्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह, बीपी अशा अनेक आजारांना आपण निमंत्रण देत आहोत, असं तज्ज्ञ सांगत आहेत..

गव्हाची पोळी जास्त प्रमाणात खाणं का टाळावं?

याविषयी तज्ज्ञ सांगतात की गव्हाच्या पोळ्या पौष्टिकच असतात. पण अगदी रोजच तुम्ही सकाळ- संध्याकाळ गव्हाच्या पोळ्याच खात असाल तर ते मात्र तुमच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतं.

कारण त्यामध्ये ग्लुटेन असतं आणि त्यामुळे अनेकांच्या अपचनाच्या, लठ्ठपणाच्या, मधुमेहाच्या समस्या वाढतात. गव्हाच्या पोळ्या सतत खाल्ल्यामुळे पित्त येणे, ढेकर येणे, गॅसेस होणे, पोट गच्च होणे असेही त्रास होतात. गव्हाच्या पोळीमध्ये कार्ब्स आणि कॅलरी यांचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे रात्रीच्या वेळी गव्हाची पोळी खाल्ल्यास ती पचायला जास्त वेळ लागतो आणि मधुमेहींच्या बाबतीत तर रक्तातील साखरेचे प्रमाण वाढण्याचाही धोका असतो. त्यामुळे गव्हाच्या पोळीचा अतिरेक टाळून त्याला तुम्ही एखादा दुसरा पर्यायही शोधायला हवा, असं तज्ज्ञ सांगतात.

गव्हाच्या पोळीसाठी काय पर्याय निवडावा?

सतत गव्हाची पोळी खाण्यापेक्षा दिवसातून एकदा तरी मल्टीग्रेन पोळ्या खायला प्राधान्य द्यावे असं तज्ज्ञ सांगतात.बोटामध्ये काटा घुसल्यास पिन, सुई वापरू नका, 'हा' उपाय करा- काटा आपोआप बाहेर येईल

मल्टीग्रेन रोटीसाठी पीठ तयार करताना त्यात गहू, मका, ज्वारी, नाचणी, बाजरी, हरबरे, मुगाची डाळ, उडदाची डाळ असे सगळेच समप्रमाणात घालावे आणि त्याचे पीठ तयार करून त्याच्या पोळ्या खाव्या. या पोळ्यांमध्ये फायबर तसेच इतरही अनेक पौष्टिक घटक असतात. शिवाय गव्हाच्या पोळीच्या तुलनेत या मल्टीग्रेन चपात्या पचायला हलक्या असतात.

# अकोला ४४.२ अंशांवर; राज्यातील तापमानात झपाट्याने वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८नागपूर :** एप्रिल महिन्याचा दुसरा आठवडा उजाडताच राज्यातील तापमानाचा पारा देखील उंचावला आहे. राज्यातील उन्हाची दाहकता वाढतच असून सोमवारी अकोला येथे राज्यातील सर्वाधिक ४४.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद अकोला येथे करण्यात आली. उन्हाळ्यातील या हंगामातील हे सर्वाधिक तापमान आहे.राज्यात गेल्या आठवड्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली आणि वाढत्या तापमानाला थोडा 'ब्रेक' लागला. त्याआधी देखील राज्यातील तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. आता अवकाळी पावसाने उसंत घेताच वातावरण थंड होण्याऐवजी तापमानात झपाट्याने वाढ झाली. एप्रिल महिना जसजसा समोर सरकत आहे, तसतशी तापमानात झपाट्याने वाढ होत आहे. सोमवारी अकोल्यातील तापमान ४४.२ अंश सेल्सिअसवर पोहोचले. जिल्ह्याचे तापमान सरासरी तापमानापेक्षा चार अंश सेल्सिअस जास्त आहे. यासोबतच, हे हंगामातील सर्वाधिक तापमान आहे. त्यापाठोपाठ ब्रम्हपूरी येथे ४३.८ तर अमरावती व चंद्रपूर येथे ४३.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद सोमवारी झाली.

उन्हाळ्यात सर्वाधिक तापमानाची नोंद दरवर्षीच विदर्भात होते. आताही उष्णतेचा कहर वाढत चालला आहे. हवामान खात्याने 'येलो अलर्ट' जाहीर केला आहे. तर पुढील काही दिवसात तापमान ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यताही वर्तवली आहे. गुजरात आणि वायव्य भारतातून येणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे विदर्भातील तापमान झपाट्याने वाढत आहे. विदर्भासह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही शहरांमध्ये तापमान ४१ व ४२ अंश सेल्सिअसपलीकडे गेले आहे.

दक्षिणेकडे हवामानाच्या प्रणालीत बदल होण्यास सुरुवात झाली आहे. तर त्याचवेळी उत्तरेकडून देखील उष्ण वारे राज्याच्या दिशेने येऊ लागले आहेत. याचा एकत्रित परिणाम म्हणून किमान तापमानात वाढ होत आहे. विदर्भात या तापमानाचा कडाका अधिक आहे. अकोला, अमरावती, नागपूर, ब्रम्हपूरी, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ या शहरांमध्ये तापमान ४२ ते ४४ अंश सेल्सिअसदरम्यान आहे. होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

# सूर्य कोपला! राज्यात उष्णतेची तीव्र लाट; विदर्भाला येलो अलर्ट, पारा ४४ अंश पार

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.८अमरावती**

अवकाळी पावसानंतर पुन्हा एकदा कडाक्याचं ऊन पडायला सुरूवात झाली आहे. महाराष्ट्रात तीव्र उष्णतेची लाट येणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात सूर्य आग ओकतोय. त्यामुळे गरज नसेल तर घराबाहेर पडू नका, अशा सूचना देणयात आल्या आहेत. विदर्भातील अनेक जिल्ह्याचा पारा ४४ अंशावर पोहचला आहे. पुढील दोन दिवस आणखी तापमान वाढण्याची शक्यता आहे. हवमान विभागाने विदर्भात उष्णतेचा यलो अलर्ट दिला आहे.

राज्यात एकीकडे उष्णतेचा इशारा दिला असतानाच काही ठिकाणी अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा अन् लातूरमध्ये अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.




विदर्भावर सूर्य कोपला

विदर्भात उष्णतेचा पारा दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. अवकाळी पावसानंतर सूर्य आग ओकत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. अकोल्याचे कमाल तापमान ४४ अंशावर पोहोचले आहे. पुढील दोन दिवस तापमानाचा पारा आणखी वाढण्याचीच शक्यता आहे. गेल्या काही दिवसात विदर्भातील पारा सरासरीपेक्षा चार अंशांनी वाढला आहे. अकोल्याचे तापमान राज्यातील सर्वाधिक ४४.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

### विदर्भात कुठे किती तापमान?

अकोला – ४४.२
ब्रह्मपुरी मध्ये ४३.८,
अमरावती आणि चंद्रपूर मध्ये ४३.६ओ तर
नागपुरात ४२.४
वाशीम – ४२.२
वर्धा – ४२.४
यवतमाळ – ४२ अंश सेल्सियस कमाल तापमानाची नोंद

पुढील दोन दिवस विदर्भात उष्ण लाटांचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. हवामान विभागाकडून उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. बदलत्या वातावरणीय स्थितीमुळे मध्य भारत, उत्तर-पश्चिम राज्यासह संपूर्ण महाराष्ट्रात पुढील तीन दिवसात कमाल तापमानात २ ते ४ अंशाची वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ८ एप्रिल २०२५

शहर/ग्रामिण


# सबसिडी बंद झाल्याने सर्वसामान्यांना गॅस परवडेना

## ग्रामीण भागात सरपण गोळा करण्याची लगबग, योजनेचा बोजवारा

## ८५० रूपये आता घरगुती गॅसची किंमत झाली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८चांदुर बाजार–** घरगुती गॅस सिलिंडरची सतत दरवाढ होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब जनता महागाईने त्रस्त झाली आहे. गॅस सिलिंडरचे वाढते दर सर्वसामान्यांना पेलवत नसल्यामुळे ग्रामीण भागातील महिलांनी पुन्हा एकदा शेत, जंगलाची वाट धरली आहे. महिलांना उन्हातान्हात शेतात वणवण करत जळणासाठी सरपण मिळविण्यासाठी शोधाशोध करावी लागत आहे. सर्वच जीवनावश्यक वस्तूंच्या दरात वाढ होत असल्याने गोरगरिबांची पंचाईत झाली. त्याचबरोबर गॅसची सबसिडी बंद झाल्यामुळे ग्रामीण भागातील महिला चुलीकडे वळत आहेत.

घरगुती गॅस सिलिंडरची किंमत ८५० रुपयांवर पोहोचली असून त्यात अतिरिक्त गाडीभाडे द्यावे लागत आहे. ग्रामीण भागातील हातावर पोट असणाऱ्या ग्रुप सर्वसामान्य गरिबांना, कष्टकरी महिलांना या सिलिंडर परवडत नसल्यामुळे पर्यायी व्यवस्था म्हणून पुन्हा चुलीकडे वळलेले दिसून येत आहे. पुन्हा सरपणाचा शोध, उसाची खोडवी, शेणाच्या गोवऱ्या, झाडांच्या वाळलेल्या फांद्या तोडून त्या रचून ठेवण्यामध्ये महिलावर्ग मग्न आहेत.

**किमती आवाक्याबाहेर**

१०० रुपयांत उज्ज्वला गॅसची जोडणी मिळत असल्याने सुरुवातीच्या काळात या योजनेला उत्तम प्रतिसादही मिळाला; परंतु सिलिंडरच्या किमती दरवाढ आवाक्याबाहेर गेल्याने आपली चूलच बरी अशी भावना गरीब कुटुंबांतील महिलांची झाली आहे.

पैसे नसल्याने सिलिंडर घ्यायचे तरी कसे ?

उज्ज्वला योजनेतून गॅस सिलिंडर आणि शेगडी सरकारकडून मिळाली, परंतु ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांना एकदा संपलेले सिलिंडर पुन्हा घेण्यासाठी पैसेच नसल्याने त्यांना ते रिफिल करता येत नाही.

त्यातही सबसिडी बंद झाली आहे. त्यामुळे योजनेचा मूळ उद्देश



बाजूला पडला आहे. गॅस सिलिंडर घेणे परवडत नसल्याने ग्रामीण भागातील जनता पुन्हा चुलींचा आधार घेत आहे.

सरपणासाठी महिला जंगलात भटकंती करत असल्याचे चित्र विशेषतः वाडी तांड्यावरील दुर्गम खेड्यापाड्यात पाहायला मिळत आहे.

# पहिली ते नववीच्या परीक्षांना आजपासून सुरुवात

## खासगी अनुदानित शाळांनी आपल्या प्रात्यक्षिक परीक्षा ८ एप्रिल पूर्वीच सुरू

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.८अमरावती** पहिली ते नववीच्या परीक्षांना आज, ८ एप्रिलपासून सुरुवात होत आहे. राज्यभरातून १ कोटी ४५ लाख विद्यार्थी या परीक्षांना बसतील. २५ एप्रिल रोजी या परीक्षा संपतील.

> प्रशासनाने सर्व तयारी व्यवस्थित केली आहे. परीक्षा वेळापत्रकानुसार पार पडणार आहेत. २५ एप्रिल रोजी परीक्षा संपणार आहेत. **सचिंद्र प्रताप सिंह,** आयुक्त, शिक्षण विभाग

यंदा प्रथमच नववीला नियतकालिक मूल्यमापन चाचणी (पॅट) पद्धती लागू करण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागाने या परीक्षांचे वेळापत्रक प्रथमच राज्यस्तरावरून जारी केले. याला शिक्षक मुख्याध्यापक संघटनांनी विरोध करत स्वतंत्र वेळापत्रकदेखील शासनाला सादर केले. त्यामुळे खासगी अनुदानित शाळांनी आपल्या प्रात्यक्षिक परीक्षा ८ एप्रिल पूर्वीच सुरू झाल्या आहेत.

# आता महिला तक्रारदारांसाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात मदतीला असणार सखी डेस्क !





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती–** पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यास जाणाऱ्या महिलांना सन्मानाची वागणूक मिळावी, याकरिता महिला मदत कक्ष स्थापन करण्याच्या सूचना यापूर्वी राज्य शासनाने दिल्या आहेत. त्या सूचनांचे पालन पोलिस खात्याकडून होत आहे. सर्वच ठाण्यांत पोलिसांचा सखी डेस्क महिलांच्या मदतीला धावत आहे. आता कुठल्याही पोलिस ठाण्यात तक्रार दाखल होते. ऑनलाइन तक्रार संबंधितांकडे पाठविली जाते.

पोलिस ठाण्यात महिला पथक आणि महिला कर्मचाऱ्यांकडून वेळोवेळी समुपदेशन केले जाते. त्यांच्या अडचणी तातडीने सोडविण्याचा प्रयत्न होतो. मागील काही वर्षांमध्ये महिलांच्या विविध प्रकारच्या तक्रारी वाढल्या आहेत. शारीरिक, मानसिक, आर्थिक छळ, अत्याचार, विनयभंग किंवा विविध प्रकारच्या किरकोळ घटना, मारहाण, वाद, भांडण, तंटे अशा प्रकारच्या तक्रारी घेवून महिला तक्रारीसाठी पोलिस ठाणे गाठत असतात. पोलिस अधीक्षक कार्यालयअंतर्गत कार्यरत असलेल्या डायल ११२ यंत्रणेवरसुद्धा या महिलांना संबंधित तक्रार देता येते. महिलाना त्यांच्या रहिवास क्षेत्रातील घराजवळ असलेल्या ठाण्यात रीतसर अर्ज, तक्रार नोंद करता येते.

### महिला तक्रारदारांसाठी प्रत्येक ठाण्यात सखी डेस्क

केंद्र शासन व राज्य शासन गृह विभाग यांच्यावतीने महिलांच्या विविध प्रकारच्या तक्रारींकडे गांभीर्याने पाहण्यासाठी व त्यांची दखल घेण्यासाठी व उपाययोजना करण्यासाठी सर्व पोलिस अधीक्षक कार्यालयांना सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार महिला तक्रारदारांसाठी प्रत्येक ठाण्यात सखी डेस्क स्थापन करण्यात आले आहे. पती–पत्नीतील वादविवाद सामंजस्याने सोडविण्याचा प्रयत्न होतो.

### महिलांना सन्मानाची वागणूक मिळावी म्हणूनमहिला मदत कक्ष:

स्वतंत्रपणे महिलांसाठी मदत कक्षसुद्धा स्थापन करण्यात आला आहे. त्यासाठी प्रत्येक ठाण्यात कर्मचारी नियुक्त केले आहेत. महिलांचे प्रश्न हे महिलांना सांगता यावेत, त्याचे अर्ज आणि शंकांचे निरसन होण्याकरिता महिला कर्मचारी, अधिकारी संवाद साधतात.

### दामिनी पथक :

शहरांतील बाजारपेठेत, शाळा, महाविद्यालय, सार्वजनिक ठिकाणे, जेथे महिलांची वर्दळ असते, अशा परिसरात महिलांना त्रासाला सामोरे जावे लागू नये, याकरिता दामिनी पथक कार्यरत आहे. या पथकाकडून गस्त घालून टवाळखोरांविरुद्ध किंवा छेडछाड प्रकरणात कारवाई करून महिलांना मदत मिळवून दिली जाते.

# गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून योजनांचा लाभ द्यावा–ॲड. निलेश हेलोंडे पाटील

## १८ हेक्टर शेती परत मिळणे स्वागतार्ह



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती,**

जिल्ह्यातील संत्रा उत्पादक भागातही शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहे. यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासोबतच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना तातडीने मदत मिळणे गरजेचे आहे. यासाठी सर्व यंत्रणांनी या गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून त्यांना योजनांचा लाभ द्यावा, असे आवाहन कै. वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड. निलेश हेलोंडे पाटील यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकऱ्यांना मदत होणाऱ्या योजनांचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी सौरभ कटियार, अतिरिक्त जिल्हाधिकारी विवेक जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर आदी उपस्थित होते. ड. हेलोंड म्हणाले, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध योजना आहेत. शेतीमधील उत्पादन वाढविण्यासोबतच शेतकऱ्यांचे मानसिक आरोग्य चांगले राहावे, यासाठी प्रेरणा प्रकल्प कार्यरत आहे. यातून शेतकऱ्यांची मानसिकता बदलणे शक्य होणार आहे. शेतकऱ्यांच्या मानसिकतेचा अभ्यास करण्यासाठी आशा कार्यकर्त्यांच्या माध्यमातून सर्वेक्षण होणे गरजेचे आहे. यासाठी योग्य ती पावले उचलण्यात येतील. जिल्ह्यात केवळ २३२ शेतकरी आत्महत्या केलेले कुटुंब आहे. त्यामुळे या प्रत्येक घरी अधिकारी पाहोचून त्यांना शासकीय योजनांची माहिती द्यावी. आत्महत्याग्रस्त कुटुंबातील युवक प्राधान्य मानून त्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. कौशल्य विकास तसेच आरसेटीच्या माध्यमातून कमी कालावधीचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. याचा उपयोग होऊन तातडीने उत्पन्नाचे साधन त्यांना मिळू शकेल. या योजना माहिती होण्यासाठी ग्रामपातळीवर प्रयत्न करण्यात यावे. यासोबतच शेतकऱ्यांना रेशनचे धान्य मिळावे, वन्य प्राण्यांचा बंदोबस्तासाठी उपाययोजना कराव्यात, कर्ज सुविधा मिळावी, शेतकऱ्यांसाठी असलेल्या योजनांचा लाभ मिळवून देण्यात यावा, तसेच सर्व बाजार समित्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक वजनकाटे सक्तीचे केल्यास शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही. तसेच अवैध सावकारांवर कारवाई करून जमीन मूळ मालकास परत करावी. यात आतापर्यंत १८ हेक्टर जमीन शेतकऱ्यांना परत करण्यात आली आहे, ही स्वागतार्ह बाब असून येत्या काळात कार्यवाहीचा वेग वाढविण्यात यावा, अशा सचूनाही ड. हेलोंडे यांनी दिल्या.

# दुचाकी अपघातात युवक ठार,एक गंभीर जखमीअपघातग्रस्त दुचाकी पेटली

### सावर्डीनजीकची घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८नांदगाव पेठ–** महामार्गावरून गावाला परत जाणाऱ्या युवकांच्या दुचाकीला मागून येणाऱ्या भरधाव वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक युवक जागीच ठार झाला तर दुसरा युवक गंभीर जखमी असल्याची घटना सोमवारी (दि.७) रात्री ८ वाजताच्या दरम्यान सावर्डीजवळील रिलायंस पेट्रोल पंपाजवळ घडली.राहुल संजय डिवरे (२६) रा. शिवणगाव फत्तेपूर असे मृतकाचे तर रोशन गजानन पांडे (२५) रा. शिवणगाव फत्तेपूर असे जखमीचे नाव आहे. घटनेनंतर बराच वेळ वाहतूक ठप्प झाली होती. घटनेबाबत सविस्तर वृत्त असे की,राहुल व रोशन हे दोघे सोमवारी रात्री दुचाकीने अमरावतीवरून राष्ट्रीय महामार्गाने गावी शिवणगाव फत्तेपूरला जात होते. सावर्डीजवळ असलेल्या रिलायन्स पेट्रोलपंपा जवळ



अचानक मागून आलेल्या भरधाव वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात राहुलचा जागीच करुण अंत झाला. तर रोशन जखमी झाला. अपघातानंतर त्यांच्या दुचाकीने पेट घेतला.अपघाताची माहिती मिळताच नांदगाव पेठचे ठाणेदार महेंद्र अंभोरे यांनी आपल्या ताफ्यासह घटनास्थळ गाठून पंचनामा केला व जखमी रोशनला तातडीने उपचारार्थ जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविले. घटनेनंतर अपघात बघण्यासाठी अनेकांनी गर्दी केली. काहींनी बचावकार्य केले. दरम्यान वाहतूक कोंडी झाल्याने बराचवेळ वाहतूक ठप्प झाली. नांदगाव पेठ पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून जखमीला रुग्णालयात पाठवले व वाहतूक सुरळीत केली.या प्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा शोध सुरू आहे.

# साक्षगंध झालेल्या तरुणीचे एका डॉक्टरच्या चुकीने तुटले लग्न

## मुलीच्या तक्रारीवरून विनयभंगाचा गुन्हा दाखल : दर्यापूरातील प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती–** दर्यापुरातील एका ३० वर्षीय डॉक्टरने २७ वर्षीय तरुणीला बोलायचे आहे – म्हणत पाठलाग केला. तसेच – फोनवरसुध्दा बोलण्याचा प्रयत्न – केला. मात्र तरुणीने बोलण्यास – नकार दिला. त्यामुळे या डॉक्टरने तीला धमकी दिली कि, नवऱ्याला –तुझी खोटी माहीती देवून बद्नामी – करतो. दरम्यान साक्षगंध झालेल्या – या तरुणीच्या सासरी जावून तीचे – मॅरेज सर्टीफिकेट डॉक्टरने दाखवले, त्यामुळे सासरच्या – मंडळींनी ३० मार्चला तरुणीच्या घरी येवून लग्न करण्यास नकार दिला व

लग्न तोडले. या प्रकरणी पिडीत तरुणीच्या तक्रारीवरून ६ एप्रिलला डॉक्टरविरुध्द विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉ. जयदिप पावडे (३०, रा. साईनगर, दर्यापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या डॉक्टरचे नाव आहे.

डॉ. पावडेकडे पिडीत तरुणी ही तीच्या आजीला उपचारासाठी घेवून जात होती. त्यामुळे डॉक्टरची या तरुणीसोबत ओळख झाली होती. दरम्यान २४ मार्चला या तरुणीचे दुसऱ्या तरुणासोबत साक्षगंध झाला. तसेच मे महिन्यात लग्नाची तारीख काढली होती. दरम्यान डॉक्टरने तरुणीचा पाठलागकेला, तू जर थांबली नाही तर तुझ्या होणाऱ्या नवऱ्याला तुझ्याबद्दल खोटी माहीती देवून तुझी बदनामी करेल, अशी धमकी दिली. दरम्यान ३० मार्चला तरुणीची सासरकडील मंडळी तरुणीच्या घरी आली.

त्यांनी सांगितले कि, डॉक्टरने आमच्या घरी येवून सांगितले कि, तरुणीचे लग्न झालेले आहे, त्याने सर्टीफिकेटसुध्दा दाखवले. त्यामुळे त्यांनी लग्न तोडले. या प्रकारामुळे तरुणीने ६ एप्रिलला दर्यापूर पोलिस ठाणे गाठून डॉ. जयदिप पावडेविरुध्द तक्रार दिली. तक्रारीवरून पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे.

# लाडकी बहीण योजना यशस्वीपणे राबवली जातेय; शिवराज सिंह चौहान यांनी केले राज्य सरकारचे अभिनंदन


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८नवी दिल्ली–** २०२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत गेमचेंजर ठरलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना लागू झाल्यापासूनच चर्चेचा विषय ठरलेली आहे. विरोधक सातत्याने या योजनेवर टीका करत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीने पुन्हा सरकार स्थापन झाल्यास लाडकी बहीण योजनेत २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले. परंतु, याची पूर्तता कधी होईल, याची निश्चित शाश्वती नसल्याचे म्हटले जात आहे. यातच आता मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी लाडकी बहीण योजनेवरून महाराष्ट्र सरकारचे अभिनंदन केले आहे.

सगळी सोंगे आणता येतात, पण पैशाचे सोंग आणता येत नाही. त्यामुळे राज्य सरकारची आर्थिक परिस्थिती सुधारल्यानंतरच माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांना वाढीव मदत देण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले होते. यानंतर विरोधकांनी पुन्हा एकदा महायुती सरकारवर वचनभंगाचा आरोप केला. परंतु, या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीबाबत शिवराज सिंह चौहान यांनी राज्य सरकारचे कौतुक केले आहे.

लाडकी बहीण योजना राज्य सरकारने तयार केली आहे आणि राज्य सरकार ती चालवत आहे. या योजनेबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना धन्यवाद देतो आणि अभिनंदन करतो. लाडकी बहीण योजना राज्य सरकारकडून चालवली जात आहे. परंतु, केंद्रातील मोदी सरकारचा संकल्प लखपती दीदी आहे, असे शिवराज सिंह चौहान यांनी म्हटले आहे.

दरम्यान, लखपती दीदी असा संकल्प घेऊन केंद्र सरकार पुढे जात आहे. याचा अर्थ असा की, महिलांचे वार्षिक उत्पन्न एक लाख



रुपयांपर्यंत जावे. म्हणजेच महिन्याला १० हजारांची मिळकत व्हावी. ३ कोटी लखपती दीदी करण्याचा संकल्प पंतप्रधान मोदींचा आहे. माझा विभाग त्यावर काम करत आहे. ०१ कोटी ४८ लाख लाभार्थी महिलांनी लखपती दीदी योजनेचा लाभ घेतला आहे. यात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. गरीब महिलांना पैशांसाठी कोणापुढेही हात पसरू नयेत, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. महिलांनाही हाताला काम मिळायला हवे, त्यांनाही प्रशिक्षण मिळायला हवे. वेगवेगळ्या उद्योगांशी त्या संपर्कात याव्यात. त्या माध्यमातून त्यांना काम मिळावे. काही ठिकाणी तर महिला यातून १० लाख रुपये वर्षाला कमवत आहेत. गरिबी हटवण्याचे एक मोठे आंदोलन सुरू असून, पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार आणि राज्य सरकार यासाठी कटिबद्ध आहेत, असे शिवराज सिंह चौहान यांनी म्हटले आहे.


विदर्भ प्रजासत्ताक

# वाढोना रामनाथ येथे नवीन पोलीस स्टेशन मंजूर करा

## नागरिकांची पोलीस अधीक्षक यांचेकडे मागणी

## संबंधित पोलीस स्टेशन आहे २० की.मी ; तर लगतचे ४० किमी अंतरावर

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.८ नांदगाव खंडेश्वर** १नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील एकदम शेवटचे गाव आणि तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या सुमारे ८ ते १० हजार लोकसंख्या असलेल्या वाढोणा रामनाथ येथे सुरक्षेच्या दृष्टीने नवीन पोलिस स्टेशन मंजूर करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत आहे.परंतु या मागणीला प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता परंतु नव्यानेच आलेले जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी अमरावती जिल्ह्यातील काही गावात नवीन पोलिस स्टेशन मंजुरीचा प्रस्ताव गृह विभागाला पाठविला असल्याने वाढोना रामनाथ वासियांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी जातीने लक्ष देऊन येथे नवीन पोलिस स्टेशन मंजुरीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याची मागणी वाढोंना रामनाथ येथील गावकऱ्यांनी केलेली आहे.स्वतंत्र काळापासून विकासाच्या दृष्टीने वाढोना रामनाथ आणि आजूबाजूला असलेले २० खेडेगाव हे अत्यंत मागासलेले आहेत वाढोना रामनाथ ही नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ आणि सर्वात मोठी ग्रामपंचायत सुद्धा आहे आणि हे तालुक्यातील सर्वात शेवटचे गाव असून या गावाला लागूनच अकोला,यवतमाळ आणि वासिम जिल्हा असल्याने नागरिकांची मोठी वर्दळ या गावात



असते कधीकाळी जिल्ह्यातील कापसाची सर्वात मोठी बाजारपेठ येथे होती हे उल्लेखनीय !वाढोना रामनाथ या गावचे पोलिस स्टेशन हे २० की.मी अंतरावर मंगरूळ चव्हाळा येथे असून रात्री बेरात्री काही घटना घडली तर येथील नागरिकांना २० की.मी.पर्यंत पायपीट करीत मंगरूळ-चव्हाळा येथे आपली तक्रार घेऊन जावे लागते आणि पोलिस घटनास्थळी दाखल होईपर्यंत आरोपी तीनपैकी कोणत्याही जिल्ह्यात पाच मिनिटात पळून जातो ही इथली परिस्थिती नित्याचीच झालेली आहे नागरिकांना आपल्या कामाकरीता २० किमी अंतरावर जाणे परवडत नाही यामध्ये नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही जातो आणि सबंधित पोलीस स्टेशनला नागरिकांना वारवार चकरा सुद्धा माराव्या लागतात त्यामुळे नागरिकांना मानसिक आणि शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागते.दिवसा वाहने मिळतात पण रात्रीला वाहन मिळत नाहीत अशी परिस्थिती या गावासह आजूबाजूच्या ग्रामीण भागातील झालेली आहे.वाढोना रामनाथ या गावापासून मंगरूळ - चव्हाळा पोलिस स्टेशन २० किमी लोणी पोलिस स्टेशन ४० किमी आणि नांदगाव खंडेश्वर पोलिस स्टेशन ४० किमी अंतरावर असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे.त्यामुळे वाढोना रामनाथ येथे सुरक्षेच्या दृष्टीने नविन पोलिस स्टेशन मंजूर होणे अत्यंत आवश्यक असून या गावात पोलीस स्टेशन करीता सर्व सोयी सुविधा उपलब्ध असल्याचे येथील नागरिकांचे मत आहे.वाढोना रामनाथ या गावाच्या आजूबाजूला सर्व मोठमोठी गावे जसे की, पापळ,लोहगाव, तिघरा,पिंपळगाव निपाणी,लोहगाव, पुसनेर,हिवरा मुरादे, राजना,काजना, वडाळा, सुकळी गुरव, कोहळा जटेश्वर, पळसमंडळ,यासह सुमारे २०ते २५ खेडेगाव येतात याना सुद्धा मंगरूळ चव्हाळा हे पोलिस स्टेशन सोयीचे होत नाही त्यामुळे वाढोना रामनाथ येथे नविन पोलिस स्टेशन मंजूर झाल्यास आजूबाजूच्या सर्व नागरिकांच्या सोयीचे होईल आणि या गावात सर्व सोयी सुविधा युक्त पोलिस स्टेशन होईल असे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे या सर्व बाबीचा विचार करून वाढोना रामनाथ येथे नव्याने पोलिस स्टेशन मंजूर करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.गोरगरीब जनतेला पोलीस स्टेशन दूर असल्याकारणाने न्याय मिळत नाही. त्यामुळे या भागातील अनेक दबावाखाली जीवन जगत असतात तर नागरिकांना अनेक वर्ष न्यायासाठी लढावे लागते.वाढोना रामनाथ येथून अवघ्या १० किमी अंतरावर देश्याचे प्रथम कृषीमंत्री तथा शिक्षणमहर्षी स्व.भाऊसाहेब डॉ.पंजाबराव देशमुख यांचे जन्मगाव पापळ सुद्धा आहे वाढोना रामनाथ लगतच यवतमाळ,अकोला,आणि वाशिम जिल्ह्याच्या सीमा लागुन आहे. त्यामुळे या गावालगतच्या शेतात अवैध धंदे,वरली मटका,जुगार हा मोठ्या प्रमाणात आहे आणि त्यांच्यावर अमरावती जिल्ह्यातील आणि मंगरूळ चव्हाळा, नांदगाव खंडेश्वर आणि लोणी येथील पोलीस यांच्यावर कार्यवाही साठी येईपर्यंत हे अवैध व्यवसाय करणारे वरील तिन्ही जिल्ह्याच्या सीमेत पडून जातात त्यामुळे त्यांच्यावर पोलीस विभाग कारवाई करून करू शकत नाहीत तसेच या गावातूनच समृध्दी महामार्ग गेलेला असल्याने या महामार्गांवर रात्रीला मोठ्या प्रमाणात दररोज गोवंश तस्करी सुरु असते. या सर्वांवर आळा घालण्यासाठी वाढोना रामनाथ या ठिकाणी पोलीस स्टेशन होणे खूप आवश्यक आहे.-

# भातकुली तालुक्यातील शेतकऱ्यांचा जिल्हा परिषदेत आक्रोश:

## खोट्या पैसेवारीमुळे सवलतींपासून वंचित;

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती-** अमरावतीच्या भातकुली तालुक्यातील शेतकऱ्यांनी आज जिल्हा परिषदेत ठिय्या आंदोलन केले. प्रत्यक्ष सर्वेक्षण न करता खोटी पैसेवारी नोंदवल्याच्या विरोधात हे आंदोलन करण्यात आले. प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाप्रमुख गजानन भुगूल यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांच्या तक्रारींना समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी जिल्हा परिषदेत ठिय्या धरला.

प्रभारी सीइओ प्रिती देशमुख आणि डेप्युटी सीईओ बाळासाहेब बायस यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना या प्रकरणाचा तातडीने निपटारा करण्याचे आदेश दिले. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, तलाठी, कृषी सहायक आणि ग्रामसेवक यांनी प्रत्यक्ष शेतीवर न जाता निवडक शेतकऱ्यांकडूनच माहिती घेऊन पैसेवारीच्या नोंदी केल्या.भातकुली तालुक्यातील ६ महसूल मंडळात पावसाच्या पाण्याने मोठे नुकसान झाले होते. मात्र प्रशासनाने तालुक्याची पैसेवारी ५३ टक्के नोंदवली. यामुळे शेतकऱ्यांना कोणत्याही सवलती मिळाल्या नाहीत. पीक विमा देखील अद्याप मिळालेला नाही.

आंदोलनात अतुल देशमुख, कल्पेश सुलतान, श्रीहरी देशमुख, अंकुश उघडे, धीरज देशमुख, अनिल रामटेके, योगेश देशमुख, नानाभाऊ मानकर, पंकज देशमुख, राहुल देशमुख, पवन देशमुख, मुरलीधर देशमुख यांच्यासह अनेक शेतकरी सहभागी झाले होते.



# श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या नवीन कार्यकारणीची स्थापना

## अध्यक्षपदी अमृत मुथा, उपाध्यक्ष, डॉ. चंदू सोजातिया, तर सचिवपदी धर्मेंद्र मुनोत







**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती-** श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ,अध्यक्षपदी अमृत मुथा, उपाध्यक्ष, डॉ. चंदू सोजातिया, सचिव, धर्मेंद्र मुनोत आणि कार्यकारी समितीची एकमताने निवड झाली.श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ, भगवान महावीर चौक बडनेरा रोड, अमरावती यांनी रविवार, ०६/०४/२०२५ रोजी आयोजित केलेल्या असाधारण बैठकीत, २०२५ ते २०२८ या वर्षासाठी नवीन कार्यकारिणीच्या स्थापनेसाठी अध्यक्षपदासाठी श्री अमृत चंपालाल मुथा यांची पुन्हा एकदा एकमताने निवड करण्यात आली. बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांनी श्री मुथा यांच्या नेतृत्वाखालील त्याच कार्यकारिणीला एकमताने मान्यता दिली.

संघाच्या वतीने सर्व सदस्यांचे आभार आणि कृतज्ञता व्यक्त करताना, श्री मुथा यांच्या नेतृत्वाखाली संघ पुढील तीन वर्षांत केवळ आपल्या उपक्रमांचा विस्तार करणार नाही तर समाजसेवा, धार्मिक जागरूकता आणि तरुणांना जोडण्याच्या दिशेने नवीन उंची गाठेल, असे मत व्यक्त करण्यात आले.

### संघटनेची कार्यकारी संस्था खालीलप्रमाणे आहे:

अध्यक्ष: अमृत चंपालालजी मुथा- उपाध्यक्ष: अनिल सुगनचंदजी कोठारी- डॉ. चंदू सजनमलजी सोजातिया- कोषाध्यक्ष: प्रकाश फतेचंदजी बैद- सचिव: धर्मेंद्र मोहनलालजी मुनोत- सहसचिव: गिरीश मानकचंदजी मारलेचा- माजी अध्यक्ष: महेंद्र इंद्रचंदजी गांधी- कार्यकारी सदस्य: रमेश नाथमलजी साबद्रा, नरेश अंबालालजी कंथालिया, शिवबाबू बिंद्राजी संकलेचा, इंदरचंद उत्तमचंदजी सुराणा, अशोक लखमीचंद जी खाबिया, महेंद्र मुकुंदचंदजी गुगलिया, सुदर्शन चोरडिया, संजय पारसमलजी मुनोत, पन्नालाल जवरीलाल ओस्तवाल, संजय प्यारेलालजी चोप्रा, मनोज ताराचंदजी मुनोत, विनोद नेमीचंदजी जांगरा, संजय मानकचंदजी बोकाडिया, रजनीश प्रकाशचंदजी कोठारी गौरव राजेंद्रजी लुनावत, असोसिएशनच्या नवीन कार्यकारिणी समितीला शुभेच्छा आणि अभिनंदन. तुमचा हा कार्यकाळ तुमच्या मागील कार्यकाळाइतकाच यशस्वी, प्रेरणादायी आणि समाजासाठी फायदेशीर असेल अशी आम्हाला आशा आहे.

# धामणगाव तालुक्यातील १९८ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांच्या जाणून घेतल्या समस्या

## शंभर दिवसाचा कृती आराखडा तालुका प्रशासन राबविले विविध उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताकदि.८धामणगाव रेल्वे-** मागील २४ वर्षात तालुक्यात सतत नापिकी व कर्जापाई आत्महत्या केलेल्या १९८ शेतकरी कुटुंबाच्या घरी तालुका प्रशासनाने भेट देऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळतो किंवा नाही याची चाचपणी केली दरम्यान ज्या योजनांचा आत्महत्याग्रस्त कुटुंबाना लाभ मिळत नाही त्यांना लाभ देण्याच्या सूचना देण्यात आल्याशासकीय व निमशासकीय कार्यालयासाठी १०० दिवसांचा कृती आराखडा अन्वये तालुक्यात जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या मार्गदर्शनात तहसिलदार अभय घोरपडे यांनी विविध उपक्रम राबवायला सुरुवात केली तालुक्यातील १९८ आत्महत्याग्रस्त कुटुंबांना तातडीने शिधा वाटप करण्यात



आले त्या कुटुंबांना विशेष बाब म्हणून प्राधान्य गटात समाविष्ट केले आहे त्यांच्या घरी भेट देऊन समस्या जाणून घेतल्या त्याबरोबर लाडकी बहिण,श्रावण बाळ, .रो.ह.यो यांचा लाभ मिळतो किवा नाही याबाबत तपासणी करण्यात आली जर लाभ मिळत नसल्यास त्यांचे अर्ज भेटीदरम्यान स्विकारण्यात आले सदर कुटुंबांना आयुष्यमान कार्ड देण्यात आले

धामणगाव रेल्वे वॉट्स अॅप चैनल


ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत विविध योजनांची माहिती पोहचविण्यकरोता महसूल विभाग धामणगाव रेल्वे वॉट्स अॅप चैनल तयार करण्यात आलेले आहे. या चॅनलच्या मार्फत विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना, उपक्रम, क्षेत्रीय अधिकारी यांचे मार्फत घेतले जाणारे शिवीर, लाभार्थ्यांच्या वैयक्तीक लाभाच्या योजना नागरिकांपर्यंत पोहचविण्यास मदत होणार आहे. सदर चैनलवर जिवंत सातबारा, उन्हाळा पीक पाहणी, नैसर्गीक आपत्तीच्या नुकसानीच्या याद्या ग्रामस्था पर्यंत पोहचविण्यात येत आहे.पी.एम. जनमन कार्यक्रम अंतर्गत तालुक्यातील नायगाव येथील कोलाम समाज (आदिम जमात) शिबिर घेऊन विविध दाखल्या सह ३५ जात प्रमाणपत्रे, कुटूंबाना शिधापत्रीका २१ उत्पन्नाचे दाखले चाटप करण्यात आले.देवगाव येथील पारधी बांधवांना विविध योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

# जिल्हा रुग्णालयात मोफत औषधी निर्णयावर प्रश्नचिन्ह

## नातेवाईकांना बाहेरून आणावे लागतात औषधी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती-** शासकीय रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना सर्व प्रकारची औषधोपचार मोफत उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. परंतु आता याच जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात दोन महिन्यांपासून जेनेरिक मेडिकल सरू झाले आहे. त्यामुळे रुग्णालयातून आता रुग्णांना औषधी मिळण्याचे प्रमाण हे काही प्रमाणात कमी झाले असले तरी औषधी घेण्यासाठी आता काही प्रमाणात रुग्णांच्या खिशाला कात्री बसायला सुरुवात झाल्याचे चित्र आहे.

राज्य शासनाने १५ ऑगस्ट २०२३ पासून राज्यातील सर्वच शासकीय रुग्णालयातील सर्वच प्रकारची आरोग्य सेवा मोफत केली. त्यासंदर्भातील शासन निर्णयही १३ ऑगस्टला जारी झाला होता. परंतु - आता त्याच शासकीय रुग्णालय परिसरात जेनेरिक मेडिकल सरू करण्यात आले आहे. शासकीय रुग्णालयातील रुग्णांना आवश्यक सर्व औषधी उपलब्ध करण्याच्या




सूचना होत्या. त्यामुळे बाहेरील औषधांची चिठ्ठी लिहून देणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले होते.तसेच जर क्वचित प्रसंगी बाहेरील औषझी देण्याची गरज पडल्यास ती देखील रुग्णालय प्रशासनाने स्वतः खरेदी करून रुग्णांना उपलब्ध करून देण्याचे आदेश होते. परंतु आता मोफत औषधांचा निर्णयच गुंडाळल्याचे चित्र आहे. त्यामुळे रुग्ण वत्यांचे नातेवाईक संत्रस्त झाले.

शासकीय रुग्णालय येथे रुग्णाची तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी दिलेल्या औषधींसाठी गेलो असता काही औषधी मिळाली, काही औषधी उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. उपलब्ध नसलेली औषधी रुग्णालय परिसरातील जेनेरिक मेडिकल मधून खरेदी केली. त्यामुळे खिशातून पैसे खचवि लागल्याचे रुग्णांचे नातेवाईक म्हणाले.शासकीय रुग्णालयातील सर्वच आरोग्य सेवा मोफतराज्य शासनाने १५ ऑगस्ट २०२३ पासून राज्यातील सर्वच शासकीय रुग्णालयातील सर्वच प्रकारची आरोग्य सेवा मोफत केली. त्यासंदर्भातील शासन निर्णयही १३ ऑगस्टला जारी झाला होता. परंतु आता त्याच शासकीय रुग्णालय परिसरात जेनेरिक मेडिकल सरू करण्यात आले आहे.

# मुख्य वनसंरक्षक कार्यालयात शेतकऱ्यांचा नुकसान भरपाई साठी एक तास ठिय्या

## शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांची धडक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती-** वन्य प्राण्यांच्या धुमाकुळाणे शेतकऱ्यांच्या शेती पिकाचें प्रचंड नुकसान झाले असून नुकसान भरपाई साठी शेतकऱ्यांनी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वात मुख्य वनसंरक्षक कार्यालयात एक तास ठिय्या देऊन नुकसान भरपाई ची मागणी केली. नांदगाव तालुक्यात वन्य प्राणी निलगाय जंगली जनावरे रानटी डुक्करे व इतर जाणवरंच्या हौदसामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे मोठे नुकसान होत असल्याने शेतकरी हैराण झाला आहे.त्यात वन विभागाने पिक नुकसान भरपाईचे शेतकऱ्याचे अर्ज रिजेक्ट केले तुटपुंजी नुकसान भरपाई शासना मार्फत देण्यात येते त्यात वनपाल व वन परीक्षेत्र अधिकारी यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई साठी हेलपाटे



घ्यावे लागते यामध्ये ढवळसरी, कोठोडा, शेलू गुंड, सार्शी, माहुली चोर, लोणी टाकळी, पिंपळगाव, शिरपूर, शिलोडा, सावंगा या भागातील शेतकऱ्यांनी मुख्य वनसरक्षक कार्यालयात धडक देऊन नुकसान भरपाई पासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी मुख्य वनसंरक्षक जोती बॅनर्जी यांचेकडे केली त्यावेळी शिवसेनेचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर संतोष मानके अनिल लेंडे वैभव सोनटक्के प्रभाकर लोहणकर अमोल सोनटक्के लियाकत अली शेख इम्रान चंद्रकांत नांदुरकर वैभव वैद्य पंकज भालेकर रुपेश काळे शिवदास नींघोट प्रजत इंगोले अतुल गावनेर दीपक धोंडसे अशोक सोनोने रुपेश राऊत व अन्य शेतकरी उपस्थित होते.

### वन्यप्राण्यांमुळे शेती पिकांचे प्रचंड नुकसान

वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्यात समन्वयाचा अभाव

वन्य प्राण्यांच्या हौदसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होत असताना वनपाल व वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्यात समन्वय नसल्याने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत नाही यांच्या समन्वया अभावी एकमेकांच्या तक्रारीत शेतकऱ्यांचे नुकसान होत तात्काळ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अन्यथा या नंतर कार्यालय सोडणार नाही असा इशारा निवेदन सादर करून शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी दिला.

आली.

विदर्भ प्रजासत्ताक

# सर्वधर्म समभाव तोडणाऱ्यांना जनता जागा दाखवेल : माजी मंत्री ॲड. ठाकूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

काही मंडळी धर्माच्या नावावर राजकारण करून आपली राजकीय पोळी शेकून घेत आहे, एखादे वेळी हे ठिक आहे. मात्र देशातील सहिष्णु जनता फार काळ हे सहन करणार नाही, सर्वधर्म समभाव तोडणाऱ्यांना देशातील जनता जागा दाखवेल, असा इशारा माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी विरोधकांना दिला आहे.

श्रीराम नवमीच्या पावन पर्वावर तिवसा तालुक्यातील मोझरी येथील जवळपास सातशे वर्ष पुरातन श्रीराम मंदिरात ॲड. यशोमती ठाकूर यांच्या उपस्थितीत राम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या पुरातन मंदिरावर नेत्रदीपक रोषणाई करण्यात आली होती. शिवाय फटाक्यांची आतषबाजी, रामनामाचा गजर सर्वांचे लक्ष वेधून घेणारा होता. ग्रामस्थ मोठ्या संख्येने या महोत्सवात सहभागी झाले होते. ॲड. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी जय श्रीरामाच्या घोषणांनी संपूर्ण परिसर निनादून गेला होता. शिवाय गावातून काढण्यात आलेल्या शोभायात्रेत मोठ्या संख्येने गावकरी सहभागी झाले होते.काही मुस्लिम बांधवांनी सुद्धा या महोत्सवाला उपस्थिती दर्शवून सर्वधर्म समभावाच्या भावनेची जपणूक केली.



### आम्ही काँग्रेसचे आणि हिंदू धर्माचे सुद्धा

आम्ही पिढ्यानपिढ्या श्रीरामाला माननारे अहोत, हा देश सर्वधर्मसमभाव मानणा-यांचा देश आहे. आणि या सर्वधर्मसमभावाला कुणी तडा देत असेल तर या देशातील नागरिक त्यांना कधीही माफ करणार नाहीत. आम्ही काँग्रेसचे आहोत आणि हिंदु धर्माचे सुद्धा, आमची संस्कृती कधीच कुण्या धर्माचा द्वेष करायला शिकवित नाही, राजकारण नसले तरी चालेल मात्र आम्ही सर्वधर्मांचा सन्मान करत राहू, असेही ॲड. यशोमती ठाकूर म्हणाल्या.

# तरुणींशी असभ्य वर्तन करणाऱ्या तरुणाला नागरिकांनी दिला चोप

## नांदगाव पेठ ठाण्याच्या हद्दीतील घटना : सोबतच्या मैत्रिणीही आल्या धावून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

सोशल मीडियावर ओळख दोन मैत्रिणींशी असभ्य वर्तन करणाऱ्या एका तरुणाला नागरिकांनी चोप देवून पोलिसांच्या ताब्यात दिले. नांदगाव पेठ ठाण्याच्या हद्दीतील कठोरा परिसरात घडली. या प्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. सैय्यद जमीर सैय्यद शकील (२५, रा. करजगाव, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे.

पीडित तरुणी व सैय्यद जमीर यांची सोशल मीडियावर ओळख झाली. त्यानंतर दोघांमध्ये बोलचाल सुरू दरम्यान, रविवारी सैय्यद जमीरने पीडित तरुणीला मोबाइलवर कॉल करून भेटायला बोलवले. त्यानुसार पीडित तरुणी ही तीच्या दोन मैत्रिणींसह त्याला भेटायला गेली. त्यानंतर त्या तिघी दुचाकीने कठोरा परिसरात गेल्या. तेथे सैय्यद जमीरने पीडित तरुणीला शारीरिक सुखाची मागणी केली. मात्र, तरुणीने त्याला नकार दिला. त्यावर त्याने तिच्यासोबत असभ्य वर्तन करून तिचा विनयभंग केला. त्यामुळे तरुणीने आरडाओरड केली. आवाज ऐकून बाजूला असलेल्या तिच्या दोन मैत्रिणी मदतीसाठी धावून आल्या. त्यावेळी सय्यद जमीरने त्या दोघींशीडी असभ्य वर्तन करून त्यांचाही विनयभंग केला. हा प्रकार परिसरातील नागरिकांच्या लक्षात आल्यावर त्यांनी तेथे धाव घेतली. नागरिकांनी सय्यद जमीरला चोप देवून नांदगाव पेठ पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठले. त्यानंतर सैय्यद जमीरला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.या प्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून नांदगाव पेठ पोलिसांनी सैय्यद जमीर विरुध्द विनयभंगाचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# लहान मुलांच्या भांडणात दोन कुटुंबात सशस्त्र हाणामारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

लहान मुलांच्या भांडणात शेजारी राहणाऱ्या दोन कुटूंबात सशस्त्र हाणामारी झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी उघडकीस आली. या घटनेत खोलापूर पोलिसांनी दोन्ही कुटूंबातील सदस्यांवर गुन्हे दाखल केले.

खोलापूर येथील रहिवासी सैयद साजीद सैयद मनसुर यांचा अल्पवयीन मुलगा शेजाऱ्यांच्या घरासमोर अन्य मुलांसह खेळत-खेळत हुल्लडबाजी करीत होता. त्यामुळे शेजारी राहणाऱ्या महिलेने त्याला हटकले आणि येथे हुल्लडबाजी करायची नाही अशी समज दिली. परंतु मुलाने महिलेला शिवीगाळ केली.त्यामुळे महिलेने पतीला सांगीतले, पत्नीला शिवीगाळ केल्यामुळे शेजाऱ्यांनी सैयद साजीदसोबत वाद घातला. वाद इतका वाढला की दोन्ही कुटूंबातील सदस्यांनी एकमेकांवर सशस्त्र हल्ला चढविला.दोन्ही कुटूंबात सशस्त्र हाणामारी होत असल्याने परिसरात चांगलीच खळबळ उडाली. याबाबत पोलिसांना माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहचले आणि दोन्ही कुटूंबातील सदस्यांची समजुत काढून वाद मिटविला.तसेच दोन्ही कुटूंबातील सदस्यांवर गुन्हे दाखल केले. यामध्ये सैयद साजीद सैयद मनसुर यांच्या तक्रारीवरून उमेर अहमद अब्दुल अजीज (वय ५०) मोहम्मद मुत्तलीब उमेर अहमद, मोहम्मद रागीब उमेर अहेमद यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला. तर उमेर अहमद अब्दुल अजीज (वय ५१) यांच्या तक्रारीवरून सैयद साजीद सैयद मनसुर (वय ४५), सैयद जावेद सैयद मनसुर, सैयद वाजीद सैयद मनसुर, गोलू उर्फ सैयद जावेद, राजू उर्फ सैयद सादीक, सैयद हारिस सैयद सादीक, मोनू सैयद सादिक (सर्व रा. खोलापुर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.



# अधिकारांपासून नागरिक अनभिज्ञ

## गावखेड्यातील देखरेख समित्या ठरताहेत कुचकामी

**विर्भ प्रजासत्ताक**
**दि.८चांदूर बाजार**

१९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत अधिकार अधिनियमानुसार कलम १४९ नुसार प्रत्येक ग्रामपंचायतीला वेगवेगळ्या विषयानुसार उपसमिती तसेच देखरेख समिती स्थापन करता येते. त्यानुसार अन्याय ग्रस्तांना या समितीच्या माध्यमातून न्याय मिळून गावात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करून गावाचा विकास साधता येतो. परंतु यासमितीला काय अधिकार आहेत वगरजपडल्यास त्याचाकसा वापर करतायेतो, हे समितीच्या सदस्यांना अथवा ग्रामस्थांना माहित नसल्याने यादेखरेख समित्या कुचकामीठरत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे.

तंटामुक्त समिती, पाणी पुरवठा समिती, रेशन देखरेख दक्षता समिती, शालेय व्यवस्थापन समिती, दारुबंदी व आरोग्य समिती यासारखा वेगवेगळ्या विषयानुसार वेगवेगळ्या समित्या गावपातळीवरग्रामसभेमध्ये तयार करता येतात व त्यानुसार संबंधित विभागावर देखरेख ठेवता येते. परंतु जिल्ह्यात परिस्थिती वेगळीच आहे. प्रत्येक ग्रामपंचातीला १२ महिन्यामध्ये चार ग्रामसभाघेणे अनिवार्य आहेव त्या घेतल्याही जातात. परंतु बरेच गावामध्येग्रामसभेलाकिंवावार्षिक सभेला ग्रामस्थांची उपस्थिती नगण्य असते. ग्रामसभेचे महत्त्व अजूनही काही नागरिकांना समजलेच नाही, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यामुळे गावाच्या लोकसंख्येनुसार ग्रामसभेला ग्रामस्थांची उपस्थिती एक तृतियांश असणे गरजेचे असते. अन्यथा कोरम अभावी ग्रामसभा बरखास्त करुन त्याच ठिकाणी दोन तासांनी ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, सचिव यांना घेण्याचा अधिकार असतो. त्याचाच फायदा सरपंच, उपसरपंच आपल्या सोयीनुसार शुभचितकांना व मनमर्जीतील लोकांना समिती, उपसमिती, देखरेख समिती, दक्षता समितीवर निवड करतात. बऱ्याच जणांना या प्रकाराची जाणीवही नसते. गावपातळीवर भ्रष्टाचार होताना दिसतात. एखाद्यावर अन्याय अत्याचार होवूनही असे प्रकरण दाबण्यास गुन्हेगारांना वाव मिळतो ग्रामपंचायत आपली संसद असते आणि या संसदेमध्ये घेतलेल्या कोणत्याही ठरावाचे। खंडण करता येत नाही. त्यासाठी सर्वसामान्य जनतेला याची जाण असणे आवश्यक आहे आणि म्हणून प्रत्येक नागरिकांनी सतर्क राहून ग्रामसभेलाउपस्थित असणेगरजेचे आहे. गावातील राशन दुकानदार दर महिन्याच्या १२ तारखेच्या आत राशन युनिटप्रमाणे वाटप करण्यात दिरंगाई करीत असेल तर देखरेख दक्षता समितीद्वारे शिस्तभंगाची कारवाई करता येते. यासारख्या गावपातळीवरील समित्या ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या कामावर नियंत्रण ठेवून ग्रामहित साध्य होवू शकते.



# अंधश्रद्धा निर्मूलन समितीची मेळघाटात जनजागृती

## २२ दिवसात ७२ गावात प्रात्यक्षिके जनसंवादाचे तब्बल १४० कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

मेळघाट या नावाने परिचित असलेल्या दुर्गम, आदिवासी बहुल भागात भाजार बरे करण्यासाठी पोटावर डागण्या देण्याची अघोरी प्रथा आहे. २१ व्या शतकात देखील अशा प्रथेमुळे होणाऱ्या बालमृत्यूची एक तरी घटना दरवर्षी माध्यमातून समोर येते. अंधश्रध्दा, अज्ञानव अगतिकता यातून निर्माण होणारा हा त्रास थांबवण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धानिर्मूलन समितीने एक जनजागृती मोहीम हाती घेतली आहे. १७ मार्च २०२५ रोजी अमरावतीच्या इर्विन चौकातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून या मोहिमेच्या पाहिल्या टप्प्याची सुरु सुरुवात झाली. ७ एप्रिल २०२५ रोजी या मोहिमेच्या पाहिल्या टप्प्याचा समारोप झाला.या मोहिमेत सहभागी झालेले नंदिनी जाधव, भगवान रणदिवे, श्रीकृष्ण धोटे या कार्यकर्त्यांनी वीस दिवसांत २२ दिवसात ७२ गावात मिळून चमत्कार प्रात्यक्षिके व जनसंवादाचेएकूण १४० कार्यक्रमकेले. या मोहिमेबद्दल माहिती सांगतान नंदिनी जाधव म्हणाल्या की, जेथे जेथे लोक एकत्र भेटतव संधी मिळे तेथे आम्ही लोकांसोबत जादूटोणा, मांत्रिकाक जाणे याबद्दल चर्चाकरत असू कामाला जाणारे खी-पुरुष रात्रीच भेटायचे. गावात वीज नसायची, चौकात सोलरव लाईट असायची; त्या लाईटच्या खांबाखालील प्रकाशात आम्ही रात्री कार्यक्रम करायचो. ही मोहीम एकूण ७२ गावांमध्ये पोचली. पुढील टप्प्यात मेळघाटातील उर्वरित गावांत आम्ही पोहोचू. अंगणवाडीतील छोटी मुले, जिल्हा परिषद शाळा, माध्यमिक उच्च माध्यमिक शाळा, आश्रम शाळा, आशा वर्कर प्रशिक्षण, अंगणवाडी से या सर्वासाठी हे कार्यक्रम घेण्यात आले. दुर्गम भागातील निवास व्यवस्था यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य, ग्रामविका शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांचे व शासनाचे सहकार्य मिळाले. त्यासाठी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा, चिखलदरा गट विकास अधिकारी मा. शिवशंकर भारसाकळे व मा. जिल्हाधिकारी सौरभकटियार त आदित्य पाटील, तालुका आरोग्य अधिकारी चिखलदरा यांचे विशेष सहकार्य लाभले, अशी माहिती पत्रकार परिषदेत नंदिनी जाधव (पुणे) ७०८३७३४०४४, प्रविणदेशमुख (मुंबई) ९८२०४९८५६०, भगवान रणदिवे, श्रीकृष्ण धोटे आदींनी दिली.

# वडिलांचा उल्लेख पती म्हणून केल्याने अविवाहित मुलीची पंचाईत

## निवडणूक आयोगाच्या ओळखपत्रावरील प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८पथ्रोट**

गावातील एका अविवाहित मुलीच्या निवडणूक ओळखपत्रावर वडिलांचे नाव हे पती म्हणून दाखविण्यात आले. काही दिवसांपूर्वीच हे ओळखपत्र पोस्टाद्वारे घरी आल्यावर हा प्रकार उघडकीस आला. त्यामुळे ओळखपत्र दाखविताना त्या अविवाहित मुलीची चांगलीच पंचाईत होत आहे.

गतवर्षी नवरात्रीनिमित्त ऑक्टोबर २०२४ मध्ये आयोजित मतदार नोंदणी शिबिरामध्ये हा घोळ झाला असल्याचे पुढे आले आहे. आता प्रत्येक ठिकाणीओळखपत्र दाखविणे गरजेचे झाले आहे. यात निवडणूक आयोगाची ओळखपत्र तसेच आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड, आदींचा समावेश आहे. यावर नमूद फोटो, नाव, पत्ता अचूक असणे अनिवार्य आहे. नावात अथवा पत्त्यात दुरुस्ती करणे, फोटो बदलविणे, नव्याने नोंदणी करणे आदी सर्वच कामे बीएलओमार्फत होते. अशातच वॉर्ड क्रमांक चारमध्ये रहिवासी असलेल्या दोन अविवाहित मुलींनी या ठिकाणी नवरात्री उत्सवादरम्यान आयोजित एका शिबिरामध्ये ओळखपत्र तयार करण्यामाती आपले नाव नोंदविले होते परंतु आज प्रत्यक्ष पोस्टद्वारे त्यांना मतदान कार्ड आल्यावर त्यांनी ते तपासून पाहिले असता, त्यांच्या वडिलांचे नाव हे त्यांचे पती म्हणून नमुद करण्यात आले आहे. सदर प्रकरणाची त्यांनी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्याकडे तक्रार दिली आहे. यावेळी अधिक माहिती घेतली असता, कुठे सुनेला मुलगी, कुठे पतीच्या नावात चुक, तर कुण्या महिलेच्या ओळखपत्रावर पत्ता चुकीचा टाकण्यात आला असल्याचे दिसून आले. तसेच याबाबत अनेकदा तक्रार देऊनही बदल करण्यात आला नसल्याचा आरोप होत आहे.

# गुरुकुंज येथील मंदिरातील मूर्तीचे चांदीचे डोळे लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८गुरुकुंज मोझरी :**

तालुक्यातील गुरुदेवनगर गुरुकुंज येथे आठवडी बाजार व ग्रामपंचायत परिसरातील दक्षिणमुखी एका मंदिरातील मूर्तीचे चांदीचे डोळे चोरट्यांनी चोरून नेले. रविवार, ६ एप्रिल रोजी मध्यरात्री दरम्यान ही घटना घडली.तिवसा तालुक्यात चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातला असून, तालुक्यातील गुरुदेवनगर गुरुकुंज मोझरी परिसरात चोरट्यांनी आता कुलूपबंदघरांनतर मंदिराकडे आपला मोर्चा वळवला आहे. सोमवारी सकाळच्या सुमारास गावातील काही भाविक दर्शनाकरिता गेले असता, ही घटना उघडकीस आली. त्यानंतर तात्काळ नागरिकांनी ही माहिती दिल्यानंतर तिवसा पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. त्यांच्या सूचनेनुसार विधीवत पूजन करून पुन्हा चांदीचे डोळे बसविण्यात आले.दरम्यान परिसरात ही चोरी झाल्याने भाविकांकडून रोष व्यक्त होत आहे. त्यामुळे चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन कारवाई करावी, अशी मागणी विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, व परिसरातील भाविकांनी केली आहे.

# श्रीराम जन्मोत्सव समितीतर्फे धामणगावात भव्य शोभायात्रा : अमर शहीद भगतसिंग चौकात महाआरती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८धामणगाव रेल्वे**

येथील श्रीराम जन्मोत्सव समितीतर्फे शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. 'जय श्री राम' च्या गगन भेदी जयघोषानांनी शहर दुमदुमले.

दरवर्षीप्रमाणे शोभायात्रेला स्थानिक जुना दत्तापूर येथील सुरुवात झाली. याप्रसंगी शोभायात्रेत असलेल्या श्रीराम मूर्तीचे पूजन आमदार प्रताप अडसड, डॉ. धर्मचंद गुप्ता,विलास बुटले, दुर्गाप्रसाद गौतम,लक्ष्मीनारायण जयस्वाल, किसन यादव, जितेंद्र चौधरी शोभायात्रा समितीचे विवेक गौतम यांच्यासह इतर मान्यवर व आयोजन समितीच्या प्रमुखांनी केले. समितीने आमदार अडसड यांना श्रीरामाची मूर्ती याप्रसंगी भेट दिली.ढोल-ताशांच्या गजरात निघालेल्या या भव्यदिव्य शोभायात्रेमध्ये डीजेच्या तालावर भाविकांनी ताल धरला होता. दरम्यान 'जय जय राम,जय श्रीराम' च्या घोषणांनी आसमंत दुमदुमलेहोते.बेंजोबँड,भजनी मंडळे, अश्व रथावर स्वार भगवान श्रीराम लक्ष्मण सीता व पवन पुत्र हनुमानाचा सजीव देखावा,भारत माता,गाय बचेगी,देश बचेगा त्याचप्रमाणे श्रीराम द्वारा जलाभिषेक व श्री राम देखाव्याचे भाविकांनी दर्शन घेतले.भजनी मंडळ , महाकाल पथकाने गर्दीचे लक्ष वेधले.श्रीराम हनुमंताच्या वानर सेनेचे वेशभूषेतील सजीव देखाव्यात उपस्थित लहान बालके यावेळी श्रीराम जयघोषात सहभागी झाली होती.या शोभायात्रेत भगवान श्रीरामाची व हनुमानाची सुंदर आणि देखणी भव्य मूर्ती भक्तांच्या आकर्षणाचे स्थान ठरली.दरम्यान शोभायात्रेतील श्रीराम मूर्ती चे जागोजागी पुष्प वर्षाव करून पूजन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी चौक येथे महाआरती करून शोभयात्रेचे समारोप करण्यात आला. श्रीराम नवमी चे औचित्य साधून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत कार्यकारिणी सदस्य चंद्रशेखर राठी यांच्या हस्ते व शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितित महाआरती करण्यात आली.

# यंदाही मोहफुल उत्पादन घटले मात्र जुन्या मोहफुलांना सोन्याचा भाव

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मेळघाट**

मागील दोन वर्षांपासून मोहफुलांच्याउत्पादनात घट झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. राज्यातील आदिवासी पट्ट्यातील काही निवडक भागात यंदा मोहफुले आली असून आदिवासी बांधवांचे आर्थिक गणित बिघडले आहे. मात्र ज्या बांधवानी जुनी मोहफुले साठवणूक केली असेल, अशा मोहफुलांना बाजारात मागणी वाढली आहे. साधारण ५०० ते ६०० रुपये




किलोपर्यंत मार्केट मिळते आहे.

वसंत ऋतूमध्ये मोहवृक्षाला मोठ्या प्रमाणात कळ्या येऊन त्यांची फुले होऊन उष्णतेमुळे जमिनीवर गळून पडतात. या मोहफूल संकलनाच्या माध्यमातून दरवर्षीच उन्हाळ्याच्या दिवसात अनेक गोरगरीब कुटुंबांना जवळपास एक ते दीड महिना हंगामी रोजगाराची संधी उपलब्ध होत असते.वाढत्या महागाईच्या काळात मोठा आधार मिळतो. मात्र, हवामान बदलामुळे मोहफुल उत्पन्नातकमालीची घट होत आहे.मार्च महिन्याच्या पंधरवड्यापासून मोहफुलाच्या झाडांना मोठ्या प्रमाणात बहर आला आहे. मात्र, अधूनमधून बदलणाऱ्या हवामानामुळे मोहफुलांना आवश्यक असे पोषण वातावरण मिळत नसल्यामुळे मोहफुले गळून पडण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. गेल्यावर्षीप्रमाणेच यंदाही मोहफुले उत्पादन कमी असल्याचे आदिवासी बांधवानी सांगितले. मात्र मागील वर्षी वाळवून ठेवलेल्या जुन्या मोहफुलांची मागणी अधिक आहे.

**बारा महिने होते साठवण**

कडक उन्हात सुकविलेली मोहफुले प्लास्टिक कागदाच्या आवरणात हवाबंद डब्यात व्यवस्थित साठवून ठेवली जातात. पुढील वर्षी मोहफुलांचा हंगाम सुरू होण्यापूर्वी ती मोहफुले विक्रीसाठी काढली जातात. त्यांना जुनी मोहफुले असे संबोधले जाते. जुन्या मोहफुलांना अधिक मागणी असते. जुनी मोहफुले मोजक्याच कुटुंबाकडे साठवून ठेवली जातात. त्यामुळे जुन्या मोहफुलांसाठी अधिक किंमत मोजावी लागते.

# शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांचे 'जेलभरो' आंदोलन

## आयटक संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**



शालेय पोषण आहार योजना अंतर्गत कार्यरत महिला कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी म.रा. शालेय पोषण आहार कर्मचारी युनियन (आयटक) शाखा अमरावतीतर्फे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जेलभरो आंदोलन करण्यात आले.जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात, शासनाने २०२५ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार १००० रुपये मानधन वाढ लागू करावी, तसेच सध्याचे २५०० रुपयांचे मानधन अपुरे असल्यामुळे दरमहा १०,००० रुपये मानधन आणि ७,७०० रुपये निवृत्ती वेतन लागू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच, कर्मचाऱ्यांना दिवाळी व गणेशोत्सवासाठी सण अनुदान, नियमित वैद्यकीय तपासणी, रजेचा लाभ, अपघात विमा, कामाचे वेतन थेट खात्यात जमा करणे, वयोमर्यादा ओलांडल्यानंतर निवृत्ती वेतन आदी सुविधा देण्यात याव्यात, असेही निवेदनात नमूद आहे. कर्मचाऱ्यांचे शोषण थांबवून त्यांना शासनाच्या विविध योजना लागू करण्याचे आवाहनही करण्यात आले.जिल्हाध्यक्ष कॉ. हिमायत गरडे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले, येत्या काळात यावर सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा युनियनने दिला आहे.

# कत्तलीकरिता गोवंश घेऊन जाणारे वाहन पलटीपाच गोवंशाचा जागीच मृत्यू : मोर्शी अमरावती मार्गावरील गोराळा फाट्यावरील घटना : दोन आरोपी शिरखेड पोलिसांच्या ताब्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

आज मंगळवार रोजी सकाळी सहा वाजता अमरावती येथील गोविंद पथक पेट्रोलिंग करत असताना अमरावतीकडे भरधाव वेगात येत असलेले बोलेरो पिकप क्रमांक एम पी१९ जीए ४८६७ या वाहनांमध्ये गोवंश असल्याचा पोलिसांना संशय आल्याने सदर वाहनाला पोलिसांनी थांबविण्याचा इशारा केला परंतु वाहनचालकाने भरधाव वेगात वाहन चालवून वाहन पलटी केले. पलटी झालेल्या वाहनात १४ गोवंश



कत्तलिकरीता आरोपी घेऊन जात होते. वाहन पलटी झाल्याने त्यामधील चार गोवंशाचा जागीच मृत्यू झाला. तर उर्वरित गोवंशी जनावरे चारा पाणी व देखके करिता विचोरी येथील गौरक्षन येथे पाठविण्यात आले. कत्तली करिता घेऊन जाणारे आरोपी मध्ये शेख मोसिन शेख रिजवान राहणार धनोडी तालुका वरुड, शेख फारूक अब्दुल गणी राहणार वरुड, व चालक मतीन शेख राहणार लालखडी यांचे विरुद्ध पोलिसांनी विविध कलमानुसार गुन्हे नोंदविले असून सदरची कारवाई गोवंश पथक अमरावती चे पोलीस उपनिरीक्षक गणेश शिंदे, पोलीस हेड कॉन्स्टेबल संतोष तेलंग, पोलीस कॉन्स्टेबल सागर कुरळकर, पोलीस कॉन्स्टेबल भारत कासदेकर, पोलीस कॉन्स्टेबल राजेश कासोटे, चालक किशोर सुने, शिरखेड पोलीस स्टेशनचे ठाणेदार सचिन लुले यांच्या मार्गदर्शनात पोलीस कॉन्स्टेबल गजानन तिजारे प्रकाश बिरोले यांनी केली असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

# भर उन्हाळ्यात परीक्षा घेण्याचे औचित्य काय?, उच्च न्यायालयाचा सवाल

## स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ व महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ यांनी केली होती उच्च न्यायालयात याचिका दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

राज्यातील परीक्षांमध्ये एकसूत्रता यावी यासाठी राज्य शैक्षणिक विभागाने २५ एप्रिलपर्यंत परीक्षा घेण्याबाबत परिपत्रक काढले. विदर्भातील अतिशय उष्ण वातावरणाचा विचार न करता सर्व राज्यात एकच नियम लागू केल्यामुळे या निर्णयाविरोधात शिक्षक संघटना व पालकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. शिक्षण संचालकाच्या परिपत्रकाचा आधार घेत विदर्भातील स्थानिक परिस्थितीनुसार विद्यार्थी हिताचा निर्णय घेण्याच्या सूचना उच्च न्यायालयाने शिक्षणाधिकारी यांना दिले.स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ व महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ तसेच काही पालकांनी उच्च न्यायालयात ही याचिका दाखल केली. याचिकेवर न्या.नितीन सांबरे आणि न्या.वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. याचिकेनुसार, राज्यातील पहिली ते नववी या वर्गाच्या परीक्षा ८ ते २५ एप्रिलदरम्यान घेण्यात याव्यात, असा निर्णय राज्याच्या शिक्षण विभागाने घेतला. परीक्षांच्या नेहमीच्या वेळापत्रकात बदल करण्याचा हा निर्णय शैक्षणिक वर्ष



संपत आले असताना अचानकपणे घेतला. दरवर्षी साधारणपणे १५ एप्रिलपर्यंत शाळांच्या परीक्षा संपत असत. शासनाच्या नव्या निर्णयामुळे आता त्या किमान दहा दिवस लांबणार आहे. एप्रिलअखेरपर्यंत विदर्भात उन्हाचा पारा चांगलाच वाढलेला असतो. विशेष बाब म्हणजे, लहान वयातील मुलांची परीक्षा एकरुपता आणण्यासाठी सर्वात शेवट सुरू करण्यात येणार आहे. परीक्षा २५ एप्रिलपर्यंत घेतल्यानंतर १ मेपर्यंत निकाल जाहीर करा, असेही शिक्षण विभागाने आपल्या आदेशात म्हटले आहे. या निर्णयाला विरोध करण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली. उच्च न्यायालयाने या निर्णयावर प्रश्न उपस्थित करत स्थानिक विद्यार्थ्यांचा हिताचा विचार करत योग्य निर्णय घेण्याच्या सूचना केला. यापूर्वी याचिकाकर्त्यांना शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन सादर करायचे आहे.

**१५ जूनपासून शाळा नको**

राज्य शासनाने ३० एप्रिल २००७ रोजी राज्यातील शाळा १५ जून रोजी सुरू करण्याबाबत परिपत्रक काढण्यात आले होते. याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्यावर ८ जून २००७ रोजी हा आदेश रद्द करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून २०२३-२४ या कालावधीत यात काही बदल झाला नाही. विदर्भातील शाळा २१ एप्रिल रोजी बंद करण्यात येत होत्या आणि ३० जून रोजी सुरू करण्यात येत होत्या. १५ जूनपासून शाळा सुरू करण्याच्या निर्णयालाही याचिकाकर्त्यांनी विरोध केला.

# पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात सातवा पदवी प्रदान समारंभ संपन्न

## सं.गा.बा. विद्यापीठातून गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय अमरावती येथे आज सत्र २०२४ मध्ये अभियांत्रिकी , एमबीए, एमसीए मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सातवा पदवी प्रदान समारंभ आज संपन्न झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील तर प्रमुख पाहुणे डॉ. महेंद्रजी ढोरे प्र -कुलगुरू संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ तसेच पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया , उपप्राचार्य डॉ.मो.झुहेर, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.दीपक शहाकार व सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.पदवी प्रदान समारंभाची सुरवात दीप प्रज्वलन, राष्ट्रगीत , महाराष्ट्रगीत व विद्यापीठाच्या गीताने करण्यात आली संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत घोषित करण्यात आलेल्या सत्र २०२४ गुणवंत विद्यार्थ्यांच्या श्रेणीमध्ये पी. आर. पोटे पाटील



अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या १५ विद्यार्थ्यांनि विविध कोर्सेस मध्ये गुणवंत यादीमध्ये आपले नाव निश्चित केले, या सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मान सोहळा पदवी प्रदान समारंभाच्या निमित्ताने पार पडला.तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शिक्षणात मोठे बदल होत असून, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे विद्यार्थ्यांसाठीही नवीन शैक्षणिक संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत, विकसित राष्ट्राच्या उभारणीमध्ये युवकांची महत्वाची भूमिका असणार आहे विकसित भारताच्या संकल्पनेत युवकांचा सक्रीय सहभाग वाढवुन त्यांना प्रोत्साहित करणे गरजेचे आहे तसेच महाविद्यालयातून पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेत असतानाच आपल्या यशाच्या कार्याची दिशा विद्यार्थ्यांनी निश्चित करावी, समाजाला व देशाला आपल्याला काय देता येईल याचा विचार प्रत्येक विद्यार्थ्यांनी यश संपादन केल्यानंतर करणे आवश्यक आहे. आपले कुटुंब व गरजवंतांसाठी आधार बना असे यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये श्रेयशदादा पोटे पाटील यांनी मत व्यक्त केले.आजचा क्षण हा केवळ या गुणवंत विद्यार्थ्यांसाठीच नाही तर प्राध्यापक, पालक आणि ज्यांच्या मेहनतीमुळे फळ मिळाले आहे त्यांच्यासाठी देखील महत्वाचा क्षण आहे, महाविद्यालयीन शिक्षणांनंतर विद्यार्थी आपआपल्या कार्यक्षेत्रात यशाचे शिखर गाठतात समाजात तसेच जगात आपले स्वतःचे नाव कमावतात, हे सर्व करत असताना व यशाचे शिखर गाठल्यानंतर आपले महाविद्यालय , प्राध्यापक यांना कधीच विसरू नका असा मोलाचा सल्ला समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. महेंद्रजी ढोरे प्र - कुलगुरू संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला.

विद्यार्थ्यांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची शक्ती असते त्यामुळे देशहित वमानवजातीच्या कल्याणासाठी योगदान देण्याचा संकल्प करावा सर्वांनी नोकरीचे ध्येयसमोर ठेवावे पण 'स्टार्टअप' सारख्या उपक्रमशीलतेला चालना देऊन आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करावी तसेच सर्व यशवंत आणि गुणवंत विद्यार्थ्यांचे स्वागत करताना खूप आनंद होत आहे असे प्रतिपादन यावेळी पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकीमहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया यांनी केले.संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची उन्हाळी सत्र २०२४ गुणवंत विद्यार्थ्यांची नावे जाहीर करण्यात आली यामध्ये पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविदयालयाच्या इलेक्ट्रीकल अभियांत्रिकी विभागातून ०३, सिव्हिल अभियांत्रिकी विभागातून ०३, संगणक अभियांत्रिकी विभागातून ०२, मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातून ०१, एमबीए विभागातून ०३ तसेच एमसीए विभागातुन ०३ अशे १५ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले उन्हाळी २०२४ मध्ये पास झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना पदवी प्रदान यावेळी समारंभा दरम्यान करण्यात आली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले मनोगत उपस्थित विद्यार्थ्यांसमोर व पालकांसमोर व्यक्त केले. या पदवी प्रदान समारंभाला सत्र २०२४ मधील ३५० पेक्षा अधिक उत्तीर्ण विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता इलेक्ट्रोनिक्स व टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकीच्या प्राध्यापकांनी अथक परिश्रम घेतले.

# स्वस्त विजेला आक्षेप घेत महावितरणने वाढवली प्रति युनिट ६० पैशांनी वीज

## महावितरणने ग्राहकांवर समायोजन शुल्क लादले : परिपत्रक काढले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नागपूर**

राज्यात १ एप्रिलपासून वीज स्वस्त होणार होती. मात्र, महावितरणने स्वस्त विजेला आक्षेप घेतल्याने महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाने याबाबतचा निर्णय स्थगित ठेवला. त्याच दरम्यान महावितरणने परिपत्रक काढून घरगुती ग्राहकांची वीज प्रति युनिट ६० पैशांनी महाग केली आहे. यासाठी इंधन समायोजन शुल्क (एफएसी) चा आधार घेण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील विजेची मागणी ३० हजार मेगावॉटच्या जवळ पोहोचली आहे. राज्यात ७ एप्रिलला सर्वाधिक मागणी २९,४११ मेगावॅट होती. यामध्ये मुंबईच्या ३७५३ मेगावॅटचाही समावेश आहे. दुसरीकडे, राज्यात खासगी कारखान्यांसह उत्पादन १८,५०३३ मेगावॅट होते. उर्वरित मागणी केंद्रीय कोटा आणि पॉवर एक्स्चेंजद्वारे पूर्ण करण्यात आली. दुसरीकडे चंद्रपूर, खापरखेडा आणि भुसावळमधील प्रत्येकी एक युनिट बंद आहे. अशा स्थितीत महावितरणला महागडी वीज खरेदी करावी लागणार आहे. परिणामी नागरिकांना एफएसीद्वारे यापुढेही आर्थिक भार सोसावा लागणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

कंपनीचे स्पष्ट म्हणणे आहे की हा एफएसी मार्चच्या वापरावरच लागू केला जाईल. मात्र, महावितरणचे वीज खरेदीचे



**घरगुती ग्राहकांवर परिणाम**

५०० युनिट्सवर ६० पैसे
३०१ ते ५०० युनिट्स ५५ पैसे
१०१ ते ३०० युनिट्स ४० पैसे
० ते १०० युनिट्स २५ पैसे
बीपीएल १० पैसे

महागडे दर पाहता ही वसुली येत्या काही महिन्यांतही सुरूच राहणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. त्याचा परिणाम घरगुती ग्राहकांसह प्रत्येक वर्गावर होणार आहे. वर्गवारीनुसार, व्यावसायिक ग्राहकांना ४० ते ६० पैसे, कृषी १५ ते ३० पैसे, पथदिवे ३० ते ३५ पैसे, पाणीपुरवठा योजना ३० ते ३५ पैसे, ईव्ही चार्जिंग स्टेशनला ४० पैसे आणि उद्योगांना ३५ ते ४० पैसे अधिक द्यावे लागतील.

कंपनीतील सूत्रानुसार, मागच्यावर्षी उन्हाळा आणि त्यानंतर मान्सूनमध्ये वीजपुरवठा कमी झाल्याने बाहेरून महाग वीज खरेदी करण्यात आली होती. आता त्याच्या भरपाईसाठी ग्राहकांकडून इंधन समायोजन शुल्क आकारावे लागेल. १ एप्रिलपासून राज्यात स्वस्त वीज उपलब्ध होणार होती, त्याच दिवशी महावितरणने परिपत्रक काढून मार्चमध्ये वापराच्या प्रत्येक युनिटवर एफएसी जमा करण्याचे आदेश दिले. यासाठी, कंपनीने ३० मार्च २०२० च्या आयोगाच्या आदेशाचा हवाला दिला.